दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

नवरात्रोत्सवानिमित्त सर्व भाविक-भक्तांना हार्दिक शुभेच्छा !

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-१५५ | मंगळवार, दि.३० सप्टेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

# अतिवृष्टीचा फटका : सोयाबीनचे उत्पादन घटणार

## भाव वाढण्याची शक्यता मात्र उत्पादन घटणार असल्याने शेतकऱ्यांना फायदा कमीच

**पुणे । प्रतिनिधी**

**देशात यंदा सोयाबीनची लागवड पाच ते सात टक्के कमी झाली. तसेच पावसामुळे प्रमुख सोयाबीन उत्पादक राज्यांमध्ये झालेले नुकसान लक्षात घेता यंदा गेल्या वर्षीच्या तुलनेत सोयाबीनचे उत्पादन १० ते १२ टक्क्यांनी कमी होण्याची शक्यता आहे. यंदा देशातील उत्पादन ९८ लाख टनांच्या पातळीला राहील. त्यामुळे सोयाबीनच्या भावात सुधारणा होण्यास मदत होईल. असा अंदाज अभ्यासकांनी व्यक्त केला आहे. दुसरीकडे भाव वाढले तरी**



**शेतकऱ्यांच्या हातात उत्पादन कमीच येणार असल्याने त्यांना होणार फायदाही त्या प्रमाणात कमी होणार आहे.**

मुंबई येथे टेफ्लास आयोजित ग्लोबऑइल कॉन्फरन्स पार पडली. यामध्ये बाजारविश्लेषक आणि उद्योगांतील जाणकारांनी सोयाबीनसह तेलबिया उत्पादन, पुरवठा आणि संभाव्य किमतीवर चर्चा केली. देशातील सोयाबीन उत्पादक राज्यांमध्ये पाऊस पडत आहे. त्यातही महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशात पावसाचे प्रमाण जास्त आहे. ऑक्टोबर महिन्यातही पाऊस पडण्याची शक्यता आहे. ऑक्टोबर महिन्यात पाऊस कमी झाला तरी पीक काढणीच्या टप्प्यात येणार असल्याने पिकाला थेट फटका बसेल. तसेच काढणीला उशीर होणार आहे. त्यामुळे उद्योगांना यंदा २० ते ३० दिवस सोयाबीनची मोठी टंचाई भासण्याची दाट शक्यता आहे. देशात यंदा सोयाबीनचे उत्पादन १५ ते २० टक्के घटण्याचा अंदाज आताच व्यक्त केला जात आहे. जसे जसे पीक नुकसानीचे आकडे पुढे येतील तसे उत्पादनात किती घट येईल, याचे चित्र स्पष्ट होईल. २०२४-२५ चा गाळप हंगाम सुरू झाला तेव्हा देशात मागील हंगामातील शिल्लक सोयाबीन ९ लाख टन होते. २०२३-२४ हंगामात हा साठा २५ लाख टनांच्या दरम्यान होता. पण यंदा जुने सोयाबीनच शिल्लक नाही. त्यामुळे सोयाबीनचे भाव गेल्या वर्षीपेक्षा अधिक राहतील, असा अंदाज ग्लोबऑइल कॉन्फरन्समध्ये जाणकारांनी व्यक्त केला. केंद्र सरकारने यंदा सोयाबीनला प्रति क्विंटल ५ हजार ३२८ रुपये हमीभाव जाहीर केला. सध्या प्रक्रिया प्लांट्सचे भाव ४ हजार ७०० रुपयांवर पोहोचले आहेत. तर जुने सोयाबीन बाजारात ४ हजार ३०० ते ४ हजार ४०० रुपयाने विकले जात आहे. नवे सोयाबीन, ज्यात ओलावा २० ते २५ टक्क्यांच्या दरम्यान आहे, ३ हजार ५०० रुपयांनी विकले जात आहे. महाराष्ट्र सरकार यंदा हमीभावाने सोयाबीन खरेदी ▶▶ पान २ वर

## अहिल्यानगर प्रकरणात षडयंत्रची शक्यता-फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

रस्त्यावर लिहिलेल्या आक्षेपार्ह मजकुरावरून अहिल्यानगरमध्ये दोन गटांत तणाव निर्माण झाला. या प्रकरणाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर दखल घेतली आहे. तसेच, अहिल्यानगरमध्ये तणाव निर्माण करण्यामागील षडयंत्राचा शोध घ्यावा लागेल, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, अहिल्यानगर पोलिसांनी आंदोलन हिंसक झाल्यानंतर ३० जणांना ताब्यात घेतले आहे.



माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अहिल्यानगरमध्ये ▶▶ पान २ वर



**बीड: एकीकडे अतिवृष्टीने शेतमालांचे नुकसान झाले आहे तर दुसरीकडे डोंगरातील रानमेवा असलेले सिताफळ बालाघाट परिसरात मोठ्या प्रमाणात विक्रीला आले आहे. हा रानमेवा सध्या प्रवास करणाऱ्यांना चांगलीच भुरळ घालतांना दिसत आहे.**

## पंचनाम्याला मुदतीचे बंधन नको-शरद पवार

**पुणे । प्रतिनिधी**

मराठवाड्यासह राज्याच्या अनेक भागांत गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे प्रचंड नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक पुरते हवालदिल झाले आहेत. उभ्या पिकांसह शेतातील सुपीक मातीही वाहून गेली आहे, विशेषत: मराठवाड्यात सर्वाधिक फटका बसला आहे. आता शरद पवार यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत सरकारला पाच प्रमुख सूचना केल्या आहेत.



राज्याच्या विविध भागांतील अतिवृष्टीचा सामना करण्यासाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी राज्य सरकारला उपाययोजनांची पंचसूत्री सुचविली ▶▶ पान २ वर

## राज्यात ११ हजार शाळेवर शिक्षिका नाहीत

### शिक्षकांसमोर मुलींनी अडचणी सांगायच्या कश्या?

**पुणे-बीड । प्रतिनिधी**

**राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेत मुले आणि मुली एकत्र शिक्षण घेतात मुलींना अनेक अडचणी असतात त्या महिला शिक्षिका असल्यास बिनधास्त अडचणी सांगू शकतात पण जर शिक्षकच नसेल तर ती मनमोकळे शिक्षकांसमोर सांगू शकत नाही राज्यातील शाळांचा आढावा घेतला असता एकूण सरकारी शाळांपैकी मिळालेल्या आकडेवारीनुसार ११ हजार ५८६ शाळांमध्ये शिक्षिका नाहीत.तेथे केवळ**



**शिक्षकच कार्यरत आहेत.**

जिल्हा परिषदेच्या राज्यातील सुमारे १५ हजाराहून अधिक प्राथमिक शाळांमध्ये एकही शिक्षिका नाहीअसा अंदाज आहे हि माहिती केवळ २४ जिल्ह्याची आहे . त्यामुळे या वाढत्या वयातील मुलींनी त्यांचे प्रश्न आणि अडचणी मांडायच्या ▶▶ पान २ वर

### शिक्षिका नसलेल्या शाळांची संख्या

अहिल्यानंतर ११५६, बीड १०५८, यवतमाळ ९७६ ,जालना ७०३, कोल्हापूर ७००, जळगाव ६६९, गोंदिया ६४५, अकोला ६२१, परभणी ५२९, नागपूर ५००, गडचिरोली ४८५, अमरावती ४८०, रत्नागिरी ४७६, लातूर ४२५, भंडारा ४०९, वर्धा ३३२, धाराशिव ३००, अलिबाग २९५, सिंधुदुर्ग २९५, नांदेड २१८, पुणे १००, हिंगोली १००, वाशिम १००, सांगली १२, एकूण ११,५८६.

## दसरा मेळाव्यासाठी कोणालाच देणगी देऊ नका

### महंत शिवाजी महाराजांचे आवाहन


**बीड । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र नारायण गडावर होणाऱ्या दसरा मेळाव्यासाठी जिल्ह्यात आणि परिसरात काहीजण देणगी मागत असल्याच्या चर्चेनंतर नारायणगडाचे महंत शिवाजी महाराजांनी आवाहन करताना म्हणाले की, दसरा मेळाव्याची कोणालाही देणगी देऊ नये. या मेळाव्याचा खर्च नारायणगड संस्थान करणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.



बीड पासून जवळच असलेल्या श्री क्षेत्र नारायण गड येथे सर्वात प्रथम माजी आमदार प्राध्यापक सुनील धांडे यांनी दसरा मेळाव्याची प्रथा सुरू केली होती. मात्र त्यानंतर खंडित पडलेल्या या मेळाव्याला मनोज जरांगे पाटील यांच्या ▶▶ पान २ वर

## माळ नववी



**नवमीचे दिवशी**
**नवदिवसांचे पारणे हो ।**
**सप्तशती जप होम हवने**
**सद्भक्ती करुनी हो**
**षड्रस अन्ने नैवेद्याशी**
**अर्पियली भोजनी हो ।**
**आचार्य ब्राह्मणा तृप्त त्वा केले**
**कृपे करुनी हो ।।९।।**
**उदो बोला उदो**
**अंबाबाई माउलीचा हो ।**
**उदोकारें गर्जती काय**
**महिमा वर्णू तिचा हो ।।**

## सात हजार नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवले

### मंत्री पंकजा मुंडेंनी केले प्रशासनाचे अभिनंदन

**जालना । प्रतिनिधी**

जोरदार अतिवृष्टीनंतर जिल्ह्यात सर्वत्र रेड अलर्ट जाहीर झाल्यानंतर जिल्हा प्रशासनाने तातडीने हालचाली करत सात हजारांहून अधिक नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवले. पुरात सापडलेल्या लोकांना अन्न धान्यासह त्यांच्या जेवणाची देखील सोय केली. केवळ माणसानांच नाही तर शेतकऱ्यांच्या पशूधनाला देखील प्रशासनानेच वाचवले. राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी ▶▶ पान २ वर



## यश ढाका खून प्रकरणी सुजात आंबेडकर पोलिस यंत्रणेवर चिडले

**बीड । प्रतिनिधी**

येथील पत्रकार देवेंद्र ढाका यांचा मुलगा यश ढाका याचा गुरुवारी संध्याकाळी खून करण्यात आला. या प्रकरणातील आरोपींना अटक करण्याची मागणी होत आहे. दरम्यान, सोमवारी वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांनी ढाका यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी त्यांनी पोलीस अधिकाऱ्यांना फोन करत आरोपींना पाठीशी घालू ▶▶ पान २ वर



## तांत्रिक बिघाडामुळे लाडक्या बहिणींची ई-केवायसी होईना

### ग्रामीण महिलांना सर्वाधीक त्रास, रांगेत उभे राहूनही निराशा


**मुंबई । प्रतिनिधी**

**लाडकी बहिण योजनेतील लाभार्थी महिलांना ईकेवायसी बंधनकारक केल्याने अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्रामीण भागातील महिला दूरदूरहून सायबर केंद्रांवर येत आहेत. रांगा लावूनही तांत्रिक अडचणींमुळे त्यांना निराश होऊन घरी परतावे लागत आहे. यामुळे लाभार्थी महिलांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.**

राज्य सरकारने ऐन विधानसभा निवडणुकीपूर्वी सुरु केलेल्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी ई-केवायसी प्रक्रिया अनिवार्य करण्यात आली आहे. मात्र आता यामुळे अनेक महिला लाभार्थींना ▶▶ पान २ वर

### तांत्रिक अडचणी दूर करण्याची मागणी

महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ लवकरात लवकर मिळावा यासाठी तांत्रिक अडचणी दूर कराव्यात, अशी मागणी स्थानिक प्रशासनाकडे केली आहे. शासनाने या समस्येकडे त्वरित लक्ष देऊन ई-केवायसीची वेबसाइट सुरळीत कार्यरत करण्याची व्यवस्था करावी, जेणेकरून गोरगरीब आणि गरजू महिलांनी अशीही मागणी केली जात आहे.



## मराठवाड्यातील पूरस्थिती नियंत्रणात-मुख्यमंत्री

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील काही भागासह मराठवाड्यातील पूरस्थिती आता नियंत्रणात आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, सोमवारी सकाळी (दि. २९ सप्टेंबर) मराठवाड्यातील पूरस्थिती आणि राज्यातील विविध धरणांतील विसर्ग याचा आढावा घेतला. जायकवाडी धरणातून १,८८०० क्युसेक इतका विसर्ग सुरु आहे. सुदैवाने पाऊस बंद झाल्याने आता विसर्ग वाढविण्याची ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### बारावी परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ

● पुणे: राज्यातील अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीमुळे बारावीच्या विद्यार्थ्यांना परिक्षा अर्ज भरण्यास देखील अडचणी निर्माण होत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने एक महत्वाचा निर्णय घेत बारावीच्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा दिला आहे. बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्यास आता २० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य परीक्षा मंडळाने घेतला आहे. राज्यातील इयत्ता बारावीच्या विद्यार्थी-विद्यार्थीनींना परीक्षा अर्ज भरण्याची ३० सप्टेंबर २०२५ रोजी शेवटची मुदत होती. मात्र मराठवाडा, नाशिक, सोलापूर, अहिल्यानगर आणि राज्यात होत असलेली अतिवृष्टिमुळे पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मुदतीत परीक्षेसाठी अर्ज भरणे शक्य नसल्याने अनेक विद्यार्थ्यांनी, पालकांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांना संपर्क करून अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्याबाबत विनंती केली होती.

### विधानसभेचे विशेष अधिवेशन घ्या-वडेट्टीवार

● मुंबई: राज्यात झालेल्या अतिवृष्टी आणि पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर तातडीने विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. याबाबत विजय वडेट्टीवार यांनी राज्याचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांना पत्र लिहीत मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र यांसह राज्याच्या अनेक भागांमध्ये अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या गंभीर आपत्कालीन परिस्थितीकडे राज्यपालांचे लक्ष वेधले. राज्यातील नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी आणि सामान्य नागरिक संकटात सापडले असून त्यांचे कधीही भरून न येणारे नुकसान झाल्याची बाब निदर्शनास आणून दिली. विजय वडेट्टीवार पुढे आपल्या पत्रात म्हणाले की, राज्यात तब्बल ४ लाख हेक्टरहून अधिक क्षेत्रावरील उभी पिके पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहेत.

### पहलगाम हल्ल्यानंतर बंद केलेली पर्यटन स्थळे खुली

● श्रीनगर: जम्मू-काश्मीर प्रशासनाने सोमवारी (दि.२९) काश्मीर खोऱ्यातील सात प्रमुख पर्यटन स्थळे पुन्हा खुली केली. २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर खबरदारी म्हणून ही स्थळे बंद करण्यात आली होती. सुरक्षेचा आढावा घेतल्यानंतर जम्मू आणि काश्मीर विभागांमधील तात्पुरत्या स्वरूपात बंद केलेली काही पर्यटन स्थळे पुन्हा उघडण्याचे आदेश देण्यात आले. २२ एप्रिल रोजी पहलगाममधील बायसरन येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ लोकांचा मृत्यू झाला होता, ज्यात बहुतांश पर्यटक होते. या हल्ल्यानंतर प्रशासनाने सुमारे ५० पर्यटन स्थळे बंद केली होती. काश्मीरमध्ये पुन्हा सुरू झालेल्या सात पर्यटन स्थळांमध्ये आडू व्हॅली, राफ्टिंग पॉइंट यन्नर, अक्कड पार्क, पादशाही पार्क, कमान पोस्ट यांचा समावेश आहे.

### १ ऑक्टोबरपासून स्पीड पोस्ट महागणार!

● दिल्ली: डाक विभागाने स्पीड पोस्ट सेवेच्या शुल्कात बदल केला आहे. काही ठिकाणी शुल्क कमी करण्यात आले असले, तरी बहुतांश ठिकाणी शुल्कात वाढ करण्यात आली आहे. यासोबतच डाक विभागाने अनेक नव्या सुविधाही सुरू केल्या आहेत. यामध्ये ओटीपी आधारित डिलिव्हरी, रिअल-टाइम ट्रॅकिंग आणि ऑनलाइन बुकिंग यासारख्या सुविधांचा समावेश आहे. संचार मंत्रालयाने सांगितले की, हे बदललेले शुल्क १ ऑक्टोबर २०२५ पासून लागू होतील. डाक विभागाने देशातील आपली सेवा अधिक बळकट करण्यासाठी अनेक नव्या सुविधा सुरू केल्या आहेत.

### बिश्नोई टोळीला दहशतवादी संघटना म्हणून घोषित

● नवी दिल्ली: कॅनडा सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. बिश्नोई टोळीला दहशतवादी संघटना म्हणून घोषित केलं आहे. एनडीपी आणि कंझर्व्हेटिव्ह नेत्यांच्या मागणीनंतर कॅनडा सरकारने सोमवारी (२९ सप्टेंबर) लॉरेन्स बिश्नोई गँगला दहशतवादी संघटना म्हणून घोषित करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. या टोळीवर भारतात आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर खंडणी, खून, शस्त्रास्त्रे आणि अंमली पदार्थांच्या तस्करीच्या संबंधित गुन्हे दाखल आहेत. कॅनडा सरकारमधील सार्वजनिक सुरक्षा मंत्री गॅरी आनंदसांगरी यांनी ही घोषणा केली आहे. मंत्री गॅरी आनंदसांगरी यांनी एका निवेदनात म्हटलं की, ''हिंसाचार आणि दहशतवादाच्या कृत्यांना कॅनडामध्ये कोणतंही स्थान नाही. विशेषत: विशिष्ट समुदायांना लक्ष्य करून भीती आणि दहशतीचं वातावरण निर्माण करणाऱ्या कृत्यांना स्थान नाही. त्यामुळे कॅनडा सरकारने बिश्नोई गँगला फौजदारी संहितेअंतर्गत दहशतवादी संघटना म्हणून सूचीबद्ध केलं आहे''.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२९ सप्टेंबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७२.०० क्विंटल | २,३०० | २,७७० | २,५९० |
| ज्वारी/हायब्रिड: ९१.५० क्विंटल | २,१५१ | २,९०० | २,३९३ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : ४.०० क्विंटल | ५,८०० | ६,००० | ५,९०० |
| उडीद : ४९.०० क्विंटल | ३,८०० | ५,९०० | ५,१९५ |
| बाजरी: ७५.५० क्विंटल | १,८०० | २,८१३ | २,५१४ |
| मुग: ११.५० क्विंटल | २,५५१ | ७,१०१ | ५,६३७ |
| सोयाबीन:३४.०० क्विंटल | ३,८०० | ४,४०० | ४,०१६ |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ४,४५१ | ६,६०१ | ५,१५६ |

## अग्रलेख

# पीडितांचे दु:ख कधी हलके होणार !

राज्यात परतीच्या पावसाने कहर केला आहे. मान्सूनपूर्व पावसाने देखील जिल्ह्याच्या अनेक भागात थैमान घातले होते. तेव्हाही हजारो हेटर क्षेत्रावरील पिकांना त्याचा फटका बसला होता. आता परतीच्या पावसाने तर सर्वांचे कंबरडेच मोडले आहे. गावे, रस्ते, मंदिरे, पिके पाण्याखाली गेली आहेत. गोदावरीला उधाण आले आहे. अनेक छोटे बंधारे वाहून गेले आहेत. छोटे पूल, सांडव्यांवरून पाणी वाहात आहे. पावसाच्या प्रमाणानुसार धरणांमधून पाण्याचा विसर्ग सुरूच राहील, असे स्थानिक प्रशासनाने जाहीर केले आहे. परिणामी, गोदावरीच्या उपनद्यांना पूर येण्याचा धोका वाढला आहे. तसे झाले तर पुराचे आव्हान अधिकच बिकट होऊ शकेल.

स्थानिक प्रशासनाने नागरिकांना सावधगिरीचा इशारा दिला आहे. अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. काही गावात व्यावसायिक संकुलांमध्ये पाणी शिरले. मोठ्या प्रमाणात पशुधन मृत्युमुखी पडले आहे. वादळी वाऱ्यामुळे काहींच्या कांदा चाळींवरील पत्रे उडून गेले. तो कांदा भिजला. काही ठिकाणच्या कांदा रोपवाटिका पाण्यात बुडाल्या. त्याचा परिणाम आगामी कांदा लागवडीवर होऊ शकेल. खरीप हंगामातील मका, सोयाबीन, बाजरी यांची सोंगणी सुरू होती. काही पट्ट्यात ऑटोबर द्राक्ष छाटणीची तयारी सुरू होती. पण द्राक्षबागांमध्ये साठलेल्या पाण्यामुळे ही कामे ठप्प झाली आहेत. शिवाय फळबागा सपाट झाल्या आहेत. अहिल्यानगर-मनमाड महामार्ग पाण्याखाली गेला. गावांमध्ये पाणी शिरले आहे. ठिकठिकाणच्या स्थानिक नद्यांना पूर आल्याने तात्पुरते स्थलांतर केले गेले. काढणीला आलेला कापूस सडण्याची भीती उत्पादक व्यक्त करतात. ही फक्त वानगीदाखलची उदाहरणे आहेत. सगळीकडे सारखीच दाणादाण उडाली आहे. आगामी काही दिवस पावसाचा इशारा कायम आहे. पावसाचे प्रमाण कमी झाले नाही तर नुकसानीचे प्रमाण वाढेल हे नक्की. नाशिकला कोणीही वाली नाही. त्यामुळे नाशिकला दत्तक घेऊन त्याचा चेहरामोहरा बदलून टाकण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले होते. पण त्यांच्याऐवजी पावसानेच नाशिक जिल्ह्यातील कृषी क्षेत्राचा चेहरा बदलला आहे.

सत्ताधारी आणि इतर नेत्यांचे पाहणी दौरे सुरूच आहेत. ते होतच राहतील. पण तातडीने प्रत्यक्ष मदत दिली गेली नाही तर अशा भेटी म्हणजे शेतकऱ्यासाठी 'शब्द बापुडे' अशा ठरण्याची शक्यताच जास्त ठरू शकेल. ज्या तऱ्हेने पाऊस कोसळला किंवा कोसळत आहे त्यावरून शेती समूळ उद्ध्वस्त झाली हे सांगण्यासाठी विशेष कौशल्याची गरज नाही. शासकीय भेटींचे महत्व असते. तथापि, राजकीय भेटींचा सिलसिला पीडितांना नकोसा होतो. तंत्रज्ञानाच्या मदतीने नुकसानीचा अंदाज तुलनेने अचूक येऊ शकेल. कदाचित म्हणूनच मोबाईल किंवा ड्रोनने काढलेली छायाचित्रे पंचनाम्यासाठी ग्राह्य धरली जातील आणि कागदी अडथळे दूर केले जातील असे मुख्यमंत्र्यानी जाहीर केले आहे. तातडीने पंचनाम्यांचे आदेशही त्यांनी दिले. आदेश कागदोपत्री वजनदार ठरतात; पण ते तसे अनुभवास यावे याची दक्षता घेतली जाईल का? अन्यथा नैसर्गिक आपत्तीनंतर नुकसानग्रस्त भागांचे प्रभावशाली व्यक्तींचे दौरे पार पडतात.

आश्वासने दिली जातात. अश्रू पुसले जातात. पण नागरिकांसाठी मात्र परिस्थिती मागच्या पानावरून पुढे सुरू राहिल्याचे वेळोवेळी आढळते. दौऱ्यांच्या वेळची लगबग नंतर शांत होताना आढळते. मदत नको पण कागदपत्रांचे भेंडोळे आवरा, असे म्हणण्याची वेळ येत असल्याची तक्रार लाभार्थी अनेकदा करतात. सध्याची परिस्थिती मात्र अपवाद ठरायला हवी. कारण नुकसानच तसे झाले आहे. खरीप हंगाम मातीमोल झालाच आहे; पण रब्बीही हातातून जाईल का अशी भीती शेतकरी व्यक्त करतात. बहुतांश राजकीय पक्षांचे मंत्री, खासदार व आमदारांनी पूरग्रस्तांच्या मदतीसाठी त्यांचे एक दिवसाचे वेतन दिल्याचे त्यांच्या नेत्यांनी जाहीर केले आहे. राज्यातील सुमारे दीड लाख अधिकाऱ्यांचे एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीला दिले जाईल, असे महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाने माध्यमांना सांगितले. घोषणा प्रत्यक्षात आल्याचे देखील यथावकाश जाहीर केले जाईल अशी जनतेची अपेक्षा आहे. अशा स्वयंस्फूर्त पुढाकाराचे समाज स्वागत करेल. नुकसानीच्या मुद्यावरून राजकारण नकोच. त्यामुळे पीडितांचे दु:ख हलके होणार नाही. त्यापेक्षा असा सक्रिय आर्थिक सहभाग कदाचित इतरेजनांनाही प्रेरणादायी ठरू शकेल. तथापि, पुरेशी तातडीने आणि विनासायास सरकारी मदत हाच खरा यावरचा उपाय आहे.

# श्री.मत्स्योदरी देवी संस्थांनाचे चोरी गेलेले ६० हजार रुपये

## न्यायालयाचे आदेशावरून परत मिळाले



**अंबड । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील भक्ताचे आराध्य दैवत श्री. मत्स्योदरी देवी मंदिरातील दानपेटी फोडून चोरट्यानी भक्तांनी देवीस अर्पण केलेले एकूण ६०,००० रुपये (साठ हजार रुपये) लंपास केले होते यासंदर्भात देवी संस्थानचे व्यवस्थापक कैलास शिंदे यांनी फिर्यादी होऊन अंबड पोलीस स्टेशन येथे गुरण ५७६/२०२३ गुन्हा कलम ४५७,३८० भादवी प्रमाणे गुन्हा दाखल केला होता या दरम्यान स्थानिक गुन्हे अनवेशन विभाग व अंबड पोलिस यांनी गुन्हाचा सखोल तपास करून एकूण ५ आरोपीना ताब्यात घेऊन त्याचेंकडून दानपेटी फोडून भक्तांनी देवीच्या चरणी अर्पण केलेले एकूण ६०,०००/- रुपये जप्त केले होते यादरम्यान जप्त करण्यात आलेले पैसे न्यायालयातुन परत मिळण्यासाठी श्री. मत्स्योदरी देवी संस्थांनाचे अध्यक्ष मा. तहसीलदार अंबड यांनी संस्थांनाच्या वतीने ठराव घेऊन संस्थानचे व्यवस्थापक कैलास शिंदे यांची निवड केली अ‍ॅड कृष्णा शर्मा यांच्या मार्फत मा. प्रथमवर्ग न्यायदांडाधिकारी साहेब अंबड यांच्या न्यायलयात कलम ५०३ बी एन एस एस नुसार अर्ज दाखल केला सदर अर्जावर युक्तिवाद होऊन मा. न्यायाधीश श्वेता परिहार मॅडम यांनी अर्ज मंजूर करून संस्थांनाचे पैसे परत करण्याचा आदेश दिला असून सदर प्रकरण श्री. मत्स्योदरी देवी संस्थांनच्या वतीने न्यायालयात मांडण्यासाठी अ‍ॅड कृष्णा न शर्मा यांनी विनामूल्य सेवा केली असून नवरात्र उत्सवाच्या मुहूर्तावर त्यांनी सदर मंजूर झालेल्या आदेशाचे पत्र संस्थान ला माजी मंत्री राजेशभैय्या टोपे यांच्या हस्ते व्यवस्थापक कैलास शिंदे यांना देण्यात आली यावेळी संस्थांनाचे कर्मचारी व भक्त तेथे उपस्थित होते. सदर प्रकरणात न्यायालयात विनामूल्य सेवा दिल्याबद्दल अ‍ॅड शर्मा यांचे संस्थांनाच्या वतीने स्वागत करण्यात आले.

# ओल्या दुष्काळाने सुकले डोळयातले पाणी..

मराठवाड्यात पुरस्थितीचा कहर काही दिवसापासून आहे. मुख्य ते बीड,धाराशिव, परभणी, नांदेड, जालना, लातूर, हिंगोली छत्रपती संभाजीनगर म्हणजेच ''मराठवाडा'' पुन्हा एकदा भरडूनच निघाला. या भयावह परिस्थितीची सुरुवात आष्टी तालुक्यातील 'कडा' या गावापासून झाली. सर्वच नद्या-ओढ्यांना पूर आले. हळूहळू जिल्ह्यात४७ महसूल मंडळात अतिवृष्टी झाली. आणि पावसाने खेडेगावांपासून शहरातही धुमाकूळ घातला. आभाळ इतकं फाटलं की, पत्र्यालाच काय तर नशिबाला देखील ठिगळ लावून परिस्थिती पूर्ववत होणार नाही. पन्नास वर्षात झाला नव्हता तितका पाऊस एका महिन्यात झाला. परंतु माझ्या बळीराजाचं पन्नास वर्षाचं स्वकष्टाचं वैभव माती मोल करून गेला.मातीचा मोल'करायला माती सुद्धा शेतात राहिली नाही. ना अंत्यविधीसाठी गावात स्मशानभूमी राहिली. ना दसरा_ दिवाळी चा किराणा राहिला. ना घरातील भांडी राहिली. ना लेकराचं शैक्षणिक साहित्य ना पिकवलेलं व साठवलेलं धान्य राहिलं ना दावणीचे गुर राहिली. इतकच काय तर ना डोक्यावर छपरे राहिली आणि माफ करा ना अब्रू झाकण्यासाठी कपडे राहिली. होत्याचं नव्हतं झालं अन इतका बळीराजा उघड्यावर आला की स्वतःचा जीव मुठीत धरून कसेबसे जीव वाचले. काही वाहून गेले .अक्षरशः काळजाला धडकी भरवणारे -थरकाप उडवणारे दृश्य निर्माण झाले.आष्टी तालुक्यात प्रथमतः मा. सुरेश (आण्णा) धस यांच्या प्रयत्नांनी च्या मदतीने लोकांना जीवदान मिळाले, त्याचबरोबर संदीप भैया क्षीरसागर तथा मा .ओमराजे निंबाळकर यांच्या सक्रिय प्रयत्नांनीही अनेकांना जीवदान मिळाले.

प्रत्येकाच्या मनाला भेगा पडतील असे काहीसे चित्रीकरण आणि मुलाखती शेतकरी पुत्र विलास बडे ( न्यूज १८ लोकमत ) यांनी दाखवल्या . त्यामध्ये मन सून न करणारी मुलाखत विश्वनाथ आप्पा दातखिळे, चिंचपूर बेलगाव तालुका भूम यांची होती. १ लीटर दूध घालण्यापासून सुरू केलेल्या दुग्ध व्यवसाय १५० लिटर वर पोहोचला.त्यातून मिळणाऱ्या पैशातून जमीन घेतली कुक्कुटपालन आणि शेळीपालन सुरू केले असे आयुष्य स्थिरावण्यास ५५ वर्षे गेली आज पोटच्या लेकराप्रमाणे जपलेली ४८ जनावरे पाण्यात वाहून गेली जमिनीतील माती गेली घरातील सामान गेल जीव सोडता उरलं काहीच नाही यावरून हे निर्माण झालेला संकट किती भयान आहे याचा चुरका लागला निशब्द करणारे निरागस चेहरे आणि जीव घेण्या वेदना दिसू लागल्या. सोलापूर तथा धाराशिव जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्याचे प्रमाण वाढले बळीराजाची टीप आत्महत्ये पूर्वी लिहितो की की'' माझ्या लेकरांच्या शिक्षणची व कुटुंबाची जबाबदारी सरकारने घ्यावी ''काय बोलावं परंतु हेही दिवस जातील थोडा संयम ठेवा बांधवांनो. या माध्यमातून मी आई तुळजाभवानीच्या चरणी बळीराजाला बळ देण्याचे मागण मागते.

शेतकऱ्यांच्या डोक्यावर वाढलेला कर्जांचा डोंगर त्यांन ऐश केली म्हणून झालेला नाहीये. घाम गाळून सुद्धा त्याचा कामाची किंमत मिळाली नाही म्हणून झालाय. वैऱ्या सारखा वागतोय निसर्ग आणि धोरणाच्या खिंडीत गाठते सरकार त्यामुळे जुगारापेक्षा अनिश्चित झालीय शेती. म्हणून मरतोय शेतकरी . तरी पुन्हा त्याच दमानं डाव मांडतोय याला त्याची जिद्द म्हणावी ,मजबूरी की वेडेपणा ? शेतीप्रधान देशात शेतकरी अस्मानी संकटे आणि कर्जापाई मरतोय आणि उद्योगपती ची लाखो _कोटींची कर्ज माफ होत आहेत, असे विरोधक म्हणताय शेतकऱ्यांची कर्ज माफ करताना आणि ''ओला दुष्काळ जाहीर करा या मागणीवर अर्थमंत्री म्हणताय ''पैशाचा सोंग आणता येत नाही ''उद्योगपतीचे लाड होतात निवडणुकीच्या तोंडावर बहिणीचे लाड झाले .परंतु सत्तेत बसवणारा मायबाप शेतकरी कधीच लाडका होईल ?जगाच्या पोशिंदाच्या सातबारा कोरा करण्याची हीच ती वेळ ! सरकारकडून अपेक्षा.

संपूर्ण समाजाने एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे. मुंबई येथे आरक्षणाकरिता उभा राहिलेले लढ्याला भाकरी_चटणी पुरवण्याचे काम याचबळीराजांनी केले. आज तो प्रचंड मोठ्या संकटात सापडला आहे .ज्याप्रमाणे मा. किशोर नाना हंबर्डे(आष्टी )यांनी ''मानवतेचा हात पुढे करूया'' या आव्हानाला आष्टी मधून दातृत्वाची साथ दाखवली त्याप्रमाणे ''सर्वांनीच पुन्हा फुलाची पाकळी ''म्हणून घासातल्या घास या बळीराजाला देऊन त्यांच्या खचलेल्या कमरेला उभारी देण्याचे काम सर्व स्तरातून करावेही विनंती .त्यांची दिवाळी गोड झाली नाही तर आपली तरी कशी होईल? या माध्यमातून सर्वांना आवाहन करते की आपल्याच बरोबर बळीराजाची दिवाळी गोड करूया तसेच पुढची पिढी घडवूया!

**प्रा.सायली तानाजी हंबर्डे**
मो. ९०२११९४२९४

## पान ६ वरून...

### केज शहरात 'शिक्षक कॉलनी'

आणि सोने-चांदीचे दागिने तसेच रोख रक्कम लंपास केली. ही घटना सकाळी उघडकीस आल्यानंतर पत्रकार प्रकाश मुंडे यांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली. पोलिसांची तत्परता घरफोडीची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ तपास पथक तयार केले. त्यांनी स्वतः घटनास्थळी धाव घेत पाहणी केली आणि तपासाच्या आवश्यक सूचना दिल्या. पोलिसांच्या पथकाने तांत्रिक आणि गोपनीय माहितीच्या आधारे चोवीस तासांच्या आत एका आरोपीचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आरोपीकडून घरफोडीतील इतर आरोपींची नावे व त्याने इतर गुन्ह्यांचीही कबुली दिली असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. पोलिसांनी या घटनेतील इतर आरोपींचा शोध घेण्यासाठी तपास अधिक तीव्र केला आहे.

-----------

### पुरात वाहून गेलेला

प्रचंड पाण्याचा अंदाज न आल्याने मोटारसायकलसह पुराच्या प्रवाहात वाहून गेले.शोधमोहीमेच्या दरम्यान त्यांच्या मोटारसायकलचा काही अंतरावर शोध लागला. मात्र, सोपनील यांचा अद्याप ठावठिकाणा लागलेला नाही.गावकरी, एनडीआरएफ पथक, महसूल विभागाचे अधिकारी आणि पोलिस यंत्रणा मिळून सतत शोधकार्य करत आहेत.

-----------

### महिला सशक्तिकरण

उपप्राचार्य आनंद पाठक तसेच प्राध्यापिका अनिता बर्दापूरकर आदींची उपस्थिती होती. यावेळी महाविद्यालयाच्या वतीने पूजाताईंचा सत्कार करण्यात आला. पुढे बोलताना पूजाताई कुलकर्णी यांनी खोलेश्वर महाविद्यालयाच्या वतीने विविध उपक्रम आयोजित केले जातात त्याचे देखील कौतुक केले.यावेळी त्यांनी मी आपल्या परिवारात आल्याचा आनंद होतो आहे, परिवारानं माझा सन्मान केला मला खूप आनंद झाला आहे खोलेश्वर चा उपक्रम एक संस्कार आहे महाविद्यालय नेहमी चांगले उपक्रम घेतात असेही त्यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले.तसेच गृह विज्ञान विभागात घेतलेल्या आईस्क्रीम मेकिंग सर्टिफिकेट कोर्स यांच्या वतीने स्पर्धेत घेण्यात आलेल्या पारितोषकाचे वितरण देखील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ.फड यांनी खोलेश्वर महाविद्यालयातील विविध उपक्रमाविषयी आणि सांस्कृतिक कार्याविषयी माहिती दिली तसेच सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात महिला सर्व क्षेत्रात पुढे आहेत पूजाताई योगेश्वरी विश्वस्त मंडळाच्या कोषाध्यक्षपदी निवड झाली त्याबद्दल त्यांनी अभिनंदन केले.कार्यक्रमाच प्रास्ताविक डॉ.तृप्ती पडेकर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.मृणाल गोरे, आभार आशालता कलमे मॅडम यांनी मांडले यानंतर मुलीसाठी दांडिया देखील आयोजन करण्यात आले होते.

-----------

### उमरद खालसा ते भाटसांगवी

सोडवला जाईल असे आश्वासन दिले. त्यानंतर हे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले. या वेळी काँग्रेसचे राहुल टेकाळे, बाजार समिती उपसभापती शामराव पडूळे, शिवसंग्राम शेतकरी जिल्हा अध्यक्ष राजेंद्र आमटे, सुभाष गिराम, विठ्ठल ढोकणे, भरत साळुंके, मसुराम शिंगण, गणेश प्रभाळे, बाबु साळुंके, नागनाथ शिंगण, चंद्रकांत कंधारे, महादेव परसकर, रमेश टेकाळे, गणेश पवार, नवनाथ खराडे, बप्पा चव्हाण, सदाशिव खराडे, अब्दुल रहीम सय्यद, नारायण ढोकणे, नवनाथ प्रभाळे, बाळू कंधारे, हनुमान चव्हाण, अविनाश शिंगण, भारत चव्हाण, नितीन चव्हाण, भैय्या शिंगण, बापूराव चव्हाण, दत्ता गायकवाड, महादेव कदम, बंडू कंधारे, आकाश टेकाळे, बाळू शिंगण, अरविंद ढोकणे, सचिन चव्हाण, सचिन खराडे, महेश चव्हाण, अविनाश शिंदे, अशोक गायकवाड, दादा ढोकणे, रामनाथ कदम, योगेश कांगडे, कानिफनाथ चव्हाण, राहुल ढोकणे, सुंदर देवगुडे, रितेश ढोकणे, अमोल सालगुडे, बिभीषण देवगुडे, बंटी चव्हाण, लक्ष्मण कंधारे, अशोक गायकवाड, सुभाष दादा चव्हाण, महादेव सालगुडे, ऋषी चव्हाण, गौरव लांडे, युवराज लांडे, रमेश लांडे, कमलेश बोरवडे, भागवत पांचाळ, रवी भंडारे, माऊली परसकर, पिनु परसकर, संतोष परसकर, सोमेश्वर कापसे, कल्याण जाधव, शंकर जाधव, मारोती प्रभाळे, उमेश जाधव, आकाश जाधव, गणेश परसकर, प्रताप थापडे, शिवम जाधव, ऋषी सिरसट, नारायण कंधारे पंचक्रोशीतील शेकडो नागरिक उपस्थित एक आठवड्यात प्रशासनाने प्रश्न न सोडल्यास पुन्हा तीव्र आंदोलन करण्यात येणार असा इशारा दिला.

-----------

### पूर संकटात शिवसेना

माहिती दिली व त्यांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, प्रक्रिया आणि अधिकाऱ्यांशी संपर्क कसा ठेवायचा याचे मार्गदर्शन केले.''पूरासारख्या संकटाच्या वेळी जनता एकटी नाही. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब शिवसेना आणि शासन दोन्ही जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत,'' असे तालुकाप्रमुख उद्धव बापू मडके यांनी सांगितले.

-----------

### दै.राज्य लोकतंत्र्याच्या वृत्तानंतर

राज्यपाल राष्ट्रपती समजता का असे पण आमदार लोणीकर म्हणाले. जिल्ह्यामध्ये मुसळधार पावसामुळे तसेच ढगफुटी मुळे शेतकऱ्याचे शंभर टक्के नुकसान झाले असून याची पाहणी करण्यासाठी पालकमंत्री जिल्हाधिकारी आमदार खासदार तहसीलदार उपविभागीय अधिकारी तालुका कृषी अधिकारी ही सर्व टीम चिखलातून शेतामध्ये जाऊन पाहणी दौरा करीत आहे. परंतु सदरील दौऱ्यामध्ये कृषी अधीक्षक कापसे तोंड दाखवलं नाही तुम्हाला लाज वाटिका का असे पण एका वायरल रेकॉर्डिंग मधून आमदार लोणीकर बोलताना ऐकायला मिळाली आहे. तसेच आमदार लोणीकर म्हणाली की एका पण बैठकीला जिल्हा कृषी अधिकारी हजार नसतात. परतुर तालुक्यामध्ये सातोना मंडळांतर्गत १५० मिली पाऊस आला होता परंतु सदरील गाव कृषी विभागाने वगळून टाकण्यात आलं होतं जिल्हा कृषी अधीक्षक हे शेतकऱ्याचे दुश्मन व शत्रू आहे अशासारखे वागत आहे तुमच्यापेक्षा महिला अधिकारी बरे आहे . फक्त आरामाची पगार खात आहे थोडा तरी इमानदारीने शासनाचं काम करा जिल्हा कृषी अधीक्षक आठवड्याच्या सात दिवसांमध्ये फक्त एकच दिवस कार्यालयामध्ये येतात तुमच्या जीवाला काही वाटलं पाहिजे कशाला नाटक करता कोणाच्या जीवावर तुम्ही दादागिरी करतात तुम्ही असताना राजघराण्यातील ते चालणार नाही दौरा पाणी करायला तुमच्या पायाला चिखल लागतो का का केस भिजते तुम्ही का कलेक्टर पेक्षा मोठे आहेत का याची किंमत तुम्हाला मजा लागेल असे पण बबनराव लोणीकर म्हणाले. परतुर तालुक्यातील परतुर घोडेगाव हे पूर्ण गाव मुसळधार पावसामुळे पाण्यामध्ये गेलं होतं या ठिकाणी पण जिल्हा कृषी अधिकारी आले नाही. शेतकऱ्यावर संकट आल्यानंतर तुम्ही बिळामध्ये जाऊन लपून बसतात असं नाटक करायचं नाही नसता जिल्हा सोडून जा असा गंभीर इशारा आमदार बबनराव लोणीकर यांनी दिला आहे

-----------

## पान १ वरून...

### अतिवृष्टीचा फटका :

करणार आहे. तर मध्य प्रदेश सरकारने सोयाबीनसाठी भावांतर योजना जाहीर केली. त्याचा परिणाम बाजारावर जाणवण्याची शक्यता आहे. भावांतर योजनेमुळे तिथे शेतकरी कमी भावात सोयाबीन विकतील. सरकार हमीभाव आणि बाजारभावातील फरक आपल्या शेतकऱ्यांना देईल. त्यामुळे मध्य प्रदेशातील शेतकऱ्यांना हमीभाव मिळेल. पण एकूण देशातील बाजारभावावर यामुळे काही काळ दबाव राहू शकतो. उत्पादन घटीमुळे बाजारभावाला ज्या प्रमाणात आधार मिळायला हवा त्याला मध्य प्रदेशच्या भावांतर योजनेमुळे काही काळ खो बसण्याची शक्यता अभ्यासकांनी व्यक्त केली.

--------

### पंचनाम्याला मुदतीचे

आहे. आपत्ती निवारणाची कामे तातडीने हाती घेतानाच नुकसानभरपाईसोबत पुनरुज्जीवनाचा आराखडा तयार करावा, पंचनाम्यासाठी मुदतीचे बंधन हटवावे, शेतकरी हिताचे निर्णय घेतानाच मानसिक व सामाजिक आधारासाठी समुपदेशन शिबिरे आणि साहित्य वाटपाचे कार्यक्रम हाती घेण्याचे आवाहन शरद पवार यांनी राज्य सरकारला केले आहे.अभुतपूर्व आपत्तीमध्ये पंचनामे वेळेत उरकणे अशक्य आहे. पंचनाम्यांच्या आधारे नुकसानीचा अहवाल राज्य शासनास सादर केल्यानंतर नव्याने निदर्शनास आलेल्या नुकसानीची दखल घेतली जात नाही. उदा. अतिवृष्टीनंतर काही दिवसांनी ऊन पडल्यामुळे भिंती-छप्परांना भेगा जाऊन घरे व इतर वास्तू यांची पडझड होते. पाणी ओसरल्यानंतर पिके व पशुधन व इतर बाबींची हानी निदर्शनास येते. अशा नुकसानीचे देखील पंचनामे होऊन आपदग्रस्तांना नुकसान भरपाई मिळावी.शेतकरी व सामान्य जनता आपत्तीने कोलमडून गेली असल्याने ह्या नुकसान भरपाई सोबतच पुनरूज्जीवन कार्यक्रमाचा आराखडा तयार करण्यात यावा. ह्यात पिकांच्या पुनर्पेरणी व पुनर्लागवडीसाठी विशेष मदत , फळबागांच्या पुनरूज्जीवनासाठी विशेष मदत यांचा समावेश असावा. लहान-मोठे बंधारे, सिंचन कालवे, विहिरी, पंपिंग यंत्रणा व इतर सिंचन साधनांची दुरुस्ती व गाळ काढण्याची तसेच शेतक-यांच्या बांध-बंदिस्तीची कामे हाती घ्यावीतपीक विमा योजनेतील पात्रतेचे निकष शिथील करावेत, जेणेकरून जास्तीत जास्त शेतक-यांना विमा लाभ मिळेल. खाजगी विमा कंपन्यांकडून टाळाटाळ व दिरंगाई होणार नाही, याकडे सरकारने लक्ष द्यावे. वित्तीय संस्थांकडून कर्जदार शेतकरी व व्यवसायिक यांच्याकडून होणारी वसूली तात्काळ तहकूब करावी आणि शेतकरी व व्यवसायिक यांना दिलासा देण्यासाठी संपूर्ण कर्जमाफी जाहीर करावी.असे म्हटले आहे

--------------

### अहिल्यानगर प्रकरणात

तणाव निर्माण करण्यामागे काही षडयंत्र आहे का, हे आपल्याला पाहावे लागेल. समाजात तेढ कोण निर्माण करत आहे, हेही पाहणे आवश्यक आहे. लोकसभा निवडणुकीतही असाच प्रकार घडविण्याचा प्रयत्न झाला होता. आताही त्याच प्रकारे कोणी आपल्याला ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न करत आहे का?, असा सवाल करत प्रत्येकाला आपला धर्म पाळण्याचा अधिकार आहे, परंतु अशा प्रकारे लोकांमध्ये तणाव निर्माण करणे चुकीचे आहे, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

---------

### दसरा मेळाव्यासाठी

उपस्थितीमध्ये गतवर्षापासून सुरुवात करण्यात आली. यावर्षी देखील नारायणगडावर दसरा मेळावा होणार आहे. या दसरा मेळाव्याच्या नावाखाली काही भागात देणगी गोळा केले जात असल्याची चर्चा महंत शिवाजी महाराजांच्या कानावर गेली. त्यांनी याला विरोध करताना, सोशल मीडियावर आव्हान केले आहे. नारायण गडावरील दसरा मेळाव्यासाठी कोणी देणगी मागत असेल तर देऊ नका, दसरा मेळाव्याचा खर्च नारायणगड संस्थान करणार आहे. सध्या अतिवृष्टी पूर परिस्थिती आहे त्यामुळे शेतकरी आणि भक्त हवालदिल झाला आहे, अशात पुन्हा त्यांना त्रास देणे योग्य नाही. त्यामुळे या दसरा मेळाव्याचा संपूर्ण खर्च नारायणगड ट्रस्ट उचलणार असल्याचे मठाधिपती शिवाजी महाराज यांनी म्हटले आहे.

----------

### राज्यात ११ हजार शाळेवर

कोणाकडे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. याबाबत ग्रामविकास विभागाने ठोस धोरण ठरवण्याची गरज आहे.एखादी जरी शिक्षिका शाळेत असली, तरी विद्यार्थिनी त्यांच्याशी मन मोकळे करतात, हा इतर शाळांमधील अनुभव आहे. अगदी घरातील भांडणांपासून ते शाळेत येताना कोणी त्रास देत असेल, तर वैयक्तिक आरोग्याच्या प्रश्नांपासून ते नातेवाइकांकडून येणा-या ब-या-वाईट अनुभवांपर्यंतचे प्रश्न या मुली आपल्या विश्वासातील शिक्षिकेला सांगत असतात.परंतु, या शाळांमध्ये शिक्षिकाच नसल्याने या अडचणी, हे प्रश्न सांगायचे कोणाला हाच खरा प्रश्न त्यांच्यासमोर आहे. अगदी त्या शाळेतील शिक्षकच त्रास देत असेल, तर शाळा बंद होईल, म्हणून घरीही सांगितले जात नाही. अशीही वस्तुस्थिती काही ठिकाणी समोर आली आहे, म्हणूनच मग यावर पर्याय काढण्याची गरज आहे.

----------

### यश ढाका खून प्रकरणी सुजात

नका, अन्यथा आम्हाला मोठे आंदोलन करावे लागेल. सोबतच एसआयटी मार्फत तपास आणि बदलीची देखील मागणी करू, असे सुजात आंबेडकर यावेळी म्हणाले. पत्रकार देवेंद्र ढाका यांच्या बावीस वर्षीय मुलाची हत्या माने कॉम्प्लेक्स परिसरामध्ये गुरुवारी संध्याकाळी करण्यात आली. या हत्येचा व्हिडिओ देखील मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. या प्रकरणी पोलिसांनी काटे नामक तरूणाला ताब्यात घेतले आहे, मात्र यामध्ये शिवसेना शिंदे गटाचा पदाधिकारी देखील असल्याचा आरोप होत असून, त्याच्यासह आणखी चार आरोपिंवर गुन्हा दाखल झाला आहे. मात्र अद्याप त्यांना अटक झालेली नाही. या आरोपींना अटक करण्यात यावी, अशी मागणी करून रस्ता रोको आंदोलन करणाऱ्या व्यक्तींवरच पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. या पार्श्वभुमीवर सोमवारी वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांनी देवेंद्र ढाका यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. त्यानंतर त्यांनी पोलीस अधिकाऱ्यास मोबाईल वरून बोलताना तुम्ही आरोपींना पाठीशी घालत आहात, आरोपी का अटक होत नाहीत, आरोपींना अटक झाली नाही तर तुमची बदली आणि एसआयटीची मागणी करू आणि एक मोठे आंदोलन छेडले जाईल, असा इशारा त्यांनी दिला.

-----------

### सात हजार नागरिकांना सुरक्षित

याबद्दल कलेक्टर व प्रशासनाचे अभिनंदन केले आहे. जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या नैसर्गिक आपत्तीची माहिती पालकमंत्री मुंडे यांनी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्याकडून घेतली. अतिवृष्टीमुळे झालेल्या आपत्तीत नागरिकांना त्रास होवू नये, यासाठी काळजी घेण्याच्या सूचना दिल्या. तसेच ज्या भागात पाण्यामुळे धोका निर्माण झाला, त्या भागातील नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करुन त्यांच्या निवास, जेवणा व वैद्यकीय सोय करण्याचे निर्देशही त्यांनी प्रशासनाला दिले आहेत. प्रशासनाची तातडीने मदत ; नागरिक व पशूधनाला सुरक्षित हलवले गोदावरी नदीतून सुमारे ३ लाख क्सुसेक इतका विसर्ग करण्यात आल्याने. जिल्ह्यातील अंबड, घनसावंगी आणि परतुर तालुक्यांतील गोदावरी नदीच्या काठावरील सुमारे ३८ गावे बाधीत झाली आहेत. यामुळे बऱ्याचशा गावांना स्थलांतरीत करण्यात आले आहे. परतूर, अंबड, घनसावंगी या तालूक्यातील सुमारे ७ हजाराहून अधिक नागरिकांना विविध गावांतून सुरक्षित स्थळी स्थलांतरीत करण्यात आले आले असून, यातील ७ हजार ५९९ नागरिकांना जिल्हा परिषद शाळा आणि विविध समाजमंदिरात केलेल्या निवास व्यवस्थेत ठेवण्यात आले आहे. २३ ठिकाणी अशा निवासव्यवस्था करण्यात आल्या आहेत. तसेच त्यांना भोजन आणि सर्व सुविधा पुरविण्यात येत आहेत. अनेक शेतकर्यांच्या पशुधनालाही सुरक्षित स्थळी स्थलांतरीत करुन त्यांना चारा देण्यात येत आहे. कोणालाही इजा पोहोचू न देता नागरिकांची काळजी घेतल्याबद्दल ना. पंकजाताई मुंडे यांनी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल व त्यांच्या टीमचे अभिनंदन केले आहे.मागील काही दिवसात झालेल्या अतिवृष्टीमुळे २६ महसूल मंडळातील गावे बाधीत झाली असून, येथील नागरिकांना संकटाला सामोरे जावे लागत आहे. काही भागात घरांची पडझड झाली असून शेतीपिकांचे नुकसान झाले आहे. मात्र पूरस्थिती ओसरल्यानंतर नुकसानीची अंतिम आकडेवारी समोर येईल. सध्या नागरिकांना शासनस्तरावरून तातडीची मदत उपलब्ध करून देण्यास प्राधान्य देण्यात येत असल्याचेही मंत्री पंकजाताईंनी सांगितले

------------

### तांत्रिक बिघाडामुळे लाडक्या

मोठ्या तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. ई-केवायसीसाठी आवश्यक असलेली वेबसाइट व्यवस्थित चालत नसल्याने ग्रामीण भागातील महिलांना वारंवार सायबर कॅफेवर चकरा माराव्या लागत आहेत. ज्यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जात आहे. या तांत्रिक अडचणींमुळे अनेक पात्र महिला योजनेच्या लाभापासून वंचित राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या त्रासातून मुक्तता मिळावी, अशी अपेक्षा महिलांनी व्यक्त केली आहे. त्यासोबतच वेबसाईट तात्काळ सुरळीत करावी, अशी मागणीही केली जात आहे. राज्य सरकारने योजनेतील बोगस लाभार्थ्यांचे अर्ज मोठ्या प्रमाणात आढळून आले होते. त्यामुळे ई-केवायसी प्रक्रिया बंधनकारक करण्यात आली होती. या प्रक्रियेमुळे लाभार्थ्यांच्या कागदपत्रांची अचूक छाननी करण्यात येत होती. यामुळे बोगस अर्ज आपोआप रद्द होतील आणि खऱ्या पात्र महिलांनाच लाभ मिळेल, अशी सरकारची अपेक्षा आहे. मात्र, सध्याची तांत्रिक अडचण पाहता बोगस लाभार्थ्यांवर नियंत्रण आणण्यासाठी उचललेले हे पाऊल खऱ्या पात्र महिलांसाठीच अडथळा ठरत आहे.

----------

### मराठवाड्यातील पूरस्थिती

गरज नाही. मात्र सर्व संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना यंत्रणा सतर्क ठेवण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. येलदरी धरणातून २९,४०० क्युसेक इतका विसर्ग सुरु आहे. तो पूर्णपणे नियंत्रणात आहे. मांजरा आणि तेरणा नद्यांचा पूर आता ओसरला आहे. पश्चिम महाराष्ट्रातील स्थितीही नियंत्रणात आहे. उजनीतून ७५ हजार आणि सीना कोळेगावमधून ८० हजार क्युसेक इतका विसर्ग होत आहे. नाशिकमधील गंगापूर धरणातून ११ हजार क्युसेक इतका विसर्ग सुरु आहे. मुळा धरणातून १० हजार क्युसेक विसर्ग होत आहे. पाऊस आता कमी झाल्याने जायकवाडी धरणातून, नाशिक, नगर भागातील धरणातून विसर्ग ८७ हजारांवरुन ६८ हजार क्युसेकवर नियंत्रित करण्यात आला आहे. जळगाव जिल्ह्यातील गिरणा धरणातून ५४,५०० क्युसेक इतका विसर्ग सुरु आहे. हतनूर धरणातून ६५,८०० क्युसेक इतका विसर्ग सुरु आहे. कोकणातील सर्व नद्या आता इशारा पातळीच्या खाली असल्याचे सांगण्यात आले आहे.

**सरसकट पंचनामे करण्याचे आदेश**

अतिवृष्टीने राज्यातील अनेक भागांत शेतपिकांचे मोठे नुकसान झाले. याचा सर्वाधिक फटका सोलापूर, मराठवाड्याला बसला आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी सरसकट पंचनामे करण्याचे आदेश जिल्ह्याधिकाऱ्यांना दिले आहेत.

----------

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि. ३० सप्टेंबर २०२५




## थोडक्यात...



### राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या कार्यप्रसिद्ध शब्दाचे आयोजन

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी शिक्षण महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या कार्यप्रसिद्ध शब्दाचे आयोजन करण्यात आले या सप्ताहत निमित्त महाविद्यालयात पंडित दीनदयाळ उपाध्ये यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शक प्राचार्य डॉ विश्वास कदम कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य सोमनाथ घाडगे सर कार्यक्रमास हिंदी विभाग प्रमुख डॉ वंदन जाधव ग्रंथपाल सौ रकटे मॅडम प्राध्यापक शेख सर उपस्थित होते या कार्यक्रमाचे संचलन कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक लोखंडे सर यांनी केले पापाजी बोरखेडकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी आपले जीवन राष्ट्रासाठी घालवली त्यांचे विचारात राष्ट्रसेवा हीच मूळ भावना होते त्यांनी राष्ट्रीय एकात्मता सद्भावना सामाजिक न्याय धर्मनिरपेक्ष असे समतेची विचार मांडले राष्ट्रसेवा हा धर्म आहे प्रत्येकाने जपला पाहिजे असे मनोगत प्राध्यापक पापाजी चव्हाण यांनी व्यक्त केली या कार्यक्रमाचे आभार प्राध्यापक प्राध्यापक ज्योती रकटे यांनी मांडले या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक बापू घोक्षे कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक लोखंडे यांनी परिसर घेतले

### सरस्वती पुजन महोत्सव आज विविध कार्यक्रमांचे आयोजन

किल्लेधारुर । प्रतिनिधी

वर्षीप्रमाणे याही वर्षी सरस्वती पूजन महोत्सव धारूर शहरात उत्साहात व विविध कार्यक्रमाने साजरा केला जाणारा असून ३० सप्टेंबर रोजी सरस्वती पूजन व महाप्रसादाचे आयोजन केले आहे याचा लाभ भक्तांनी घ्यावा असे आवाहन सरस्वती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे. धारुर शहरात प्रतिवर्षी सरस्वतीदेवी पुजन मोहत्सव प्रतिवर्षी अश्विन शुध्द अष्टमीला विवीध उपक्रमानी साजरा केला जातो. सन-२०२५ या वर्षाचा सरस्वती-उत्सव दि.३०।९।२५ मंगळवार या दिवशी करण्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्या निमित्ताने दि.२९।९।२५ मुळ नक्षत्रावर देवीचे आवाहन पुजन करण्यात येते. मंगळवारी दुपारी देवीची तालुक्यातील सर्व बृह्मवृदांच्या मंत्रघोषातप्राणप्रतीष्ठा करुन महापूजा आरती करण्यात येते व महाप्रसादाचे आयोजन केले आहे व श्रवण नक्षत्रावर देवीचे मंत्रजागर करुन विसर्जन करण्यात येते. या वर्षी च्या उत्सव कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन सरस्वती उत्सव समिती तर्फे करण्यात येत आहे.

### सुंदरराव सोळंके महाविद्यालयात ब्युटी अँड कॉस्मेटिक्स विषयावर सेमिनार संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

सुंदरराव सोळंके महाविद्यालयामध्ये रसायनशास्त्र विभागातर्फे दि २९ सप्टेंबर सोमवार रोजी ब्युटी अँड कॉस्मेटिक्स या विषयावर ऑनलाईन राष्ट्रीय सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते . राजस्थान येथील प्रोफेसर डॉ.ज्योती शर्मा यांनी मार्गदर्शन केले. राजस्थान येथील प्रोफेसर डॉ. ज्योती शर्मा या प्रमुख मार्गदर्शक होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी के.सानप तसेच प्रभारी प्राचार्य डॉ. एन.के.मुळे, उपप्राचार्य डॉ.एम. ए.कव्हळे यांची ऑनलाईन उपस्थिती होती. राष्ट्रीय सेमिनारसाठी साठ लोकांची ऑनलाईन उपस्थिती होती या कार्यक्रमाचे आयोजक डॉ. अर्चना कचरे यांनी केले.प्रोफेसर डॉ. ज्योती शर्मा यांनी ब्युटी अँड कॉस्मेटिक्स या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सतीश डाके यांनी केले तर आभार डॉ. शंकर इप्पर यांनी मानले.



आष्टी : तालुक्यातील सांगवी आष्टी या गावात प्रचंड पाऊस झाल्याने पूर परिस्थिती निर्माण झाली होती गावाला नदीचा वेढा असल्याने बरेच लोक पाण्यामध्ये अडकले होते या लोकांना सही सलामत एनडीआरएफ च्या टीमने बाहेर काढले एनडीआरएफचे आभार मानताना ज्येष्ठ नेते देविदास धस, युवा नेते राधेश्याम धस, आष्टीच्या तहसीलदार वैशाली पाटील व त्यांची टीम. (छाया शरद रेडेकर)

# शासन दरबारी टाहो फोडण्यासाठी बळीराजा सज्ज



## किसान सभेच्या नेतृत्वात बळीराजा एक

परळी । प्रतिनिधी

यंदाच्या खरीप पूर्व आणि खरिपात झालेली अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात शेती, शेतीपिक, माती आणि शेतमजूर यांचे अतोनात हाल झाले असून अद्याप देखील दगडाचे काळजी असलेल्या मस्तवाल सत्ताधारी आणि प्रशासन यांना या प्रश्नी कसलाच कळवळा नसल्याने मराठवाड्यातील शेतकरी उद्या मंगळवार दि ३० रोजी संभाजी नगर येथील आयुक्त कार्यालयावर आपला टाहो फोडून आक्रोश करणार असून या निमित्ताने जिल्ह्यातील शेकडो गावातील शेतकरी मोठ्या संख्येने किसान सभेच्या नेतृत्वाखाली एकत्र झाले आहेत. अनेक तालुक्यातील गावागावात शेतकरी, शेत मजूर,कामगार, युवक एकत्र येत या आक्रोश मोर्च्याची तयारी करत आहेत.

राज्यात अनेक भागात खरीप पूर्ण एप्रिल-मे मधील अवकाळी आणि खरिपाच्या जुलै-ऑगस्ट मध्ये झालेली अतिवृष्टीमुळे शेती पिकांचे मोठे नुकसान झाले. सप्टेंबर महिन्यात राज्यात आणि जिल्ह्यात ढगफुटी सदृश्य अतिवृष्टी होऊन शेती, शेती पीक, शेती अवजारे, पशुधन यांची मोठी हानी झाली. पिढ्यानपिढ्या भरपाई होणार नाही असे शेतीचे नुकसान झाले असून सरकारने सप्टेंबर मध्ये झालेल्या नुकसानीची पाहणी न करता जुलै-ऑगस्ट मधील नुकसानीची केलेली २ हजार २०० कोटी मदत देणारे आमचे सरकार असल्याचे राज्याचे मुख्यमंत्री सांगत आहेत. जिल्ह्यात सप्टेंबर अखेर झालेल्या अतिवृष्टी आणि अतिवृष्टीमुळे आलेला पूर यामुळे लाखो हेक्टरवरील पिकासह अक्षरशः शेती वाहून गेलेली असताना सत्ताधारी मंडळी फक्त पाहणी दौरा करत आहेत. सरसगट कर्ज माफी करून बाधित क्षेत्रात ओला दुष्काळ जाहीर करून तात्काळ सर्वोतोपरी मदत विनाविलंब शेतकऱ्यांना द्यावी अशी मागणीकरिता मराठवाड्यातील शेतकरी, शेत मजूर, कामगार हजारोंच्या संख्येने संभाजी नगर येथील आयुक्त कार्यालयावर धडकून आपला आक्रोश सरकार समोर व्यक्त करणार आहेत. या आक्रोश मोर्च्याची गावोगावी जय्यत तयारी सुरू असून शेतकरी, शेतमजूर यांच्यासह युवक, विद्यार्थी देखील आता सरकारच्या उदासीन भूमीविरोधात पेटून उठले आहेत. मंगळवार दि ३० रोजी होणाऱ्या आक्रोश मोर्च्याच्या अनुषंगाने मोठ्या प्रमाणात किसान सभेच्या नेतृत्वाखाली एकजुट झाली असून मस्तवाल सरकारचे डोके जागेवर आणण्यासाठी हा आक्रोश मोर्चा असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

## लाडक्या बहिणींना दिवाळीला दोन हप्ते द्या, ओला दुष्काळ जाहीर करा-कांबळे

माजलगाव । प्रतिनिधी



लाडक्या बहिणींना केवायसी केल्यानंतर हप्ता दिला जाईल असे शासन सांगत आहे परंतु दिवाळीला एकत्रित दोन हप्ते द्या व माजलगावात ओला दुष्काळ जाहीर करून एकरी पन्नास हजार रुपये नुकसान भरपाई द्या अशी मागणी उपसरपंच अनिल राधे कांबळे यांनी शासनाकडे केले आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अंतर्गत पात्र लाभार्थी महिलांना ई केवायसी करा त्यानंतर लाभ मिळेल असे संकेत शासनाने दिले आहेत परंतु ऐन सणासुदीच्या काळात ई केवायसी चे फर्मान शासनाने काढल्याने अनेक पात्र लाभार्थी महिला वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शासनाने दिवाळीनंतर ई केवायसी अनिवार्य करावी व दिवाळीला एकत्रित दोन हफ्त्यांचा लाभ द्यावा तसेच मागील दोन दिवसांपासून अतिवृष्टी व ढगफुटी सारखा पाऊस शहरासह तालुक्यात बरसत आहे. खरीपातील पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यामुळे राज्य शासनाने ओला दुष्काळ जाहीर करून पंचनामे करण्यात वेळ न घालवता तात्काळ शेतकऱ्यांना एकरी पन्नास हजार रुपयांची नुकसान भरपाई द्या अशी मागणीही उपसरपंच अनिल राधे कांबळे यांनी केली आहे.

## कृषी उत्पन्न बाजार समितीच्या हिंदुस्थान पेट्रोल पंपाचे उद्घाटन

माजलगाव । प्रतिनिधी

येथील कृषी उत्पन्न बाजार समितीची उप बाजारपेठ असलेल्या दिंद्रुड येथे बाजार समितीच्या हिंदुस्थान पेट्रोल पंपाचे उद्घाटन आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या हस्ते दि.२८ सप्टेंबर रविवार रोजी सकाळी ११:३० वाजता संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बहुजन नेते बाबुराव पोटभरे हे तर प्रमुख पाहुणे राजाभाऊ मुंडे,संभाजीराव शिंदे,शेषराव जगताप,चेअरमन विरेंद्र सोळंके ,रवींद्र सोळके,महादेव तोंडे,अच्युतराव लाटे,संभाजी शेजुळ,बजरंग साबळे ,संतोषराव यादव नवनाथ धाईजे,भीमराव टाकणखार अजय कोमटवार,अजय जाधव, शेख अखिल भाई,नानासाहेब ठोंबरे, सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे यांची उपस्थिती होती.प्रास्ताविक सभापती जयदत्त नरवडे यांनी केले. उद्घाटन पर भाषणात आमदार सोळंके म्हणाले की, शेतकऱ्यांना अधिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा बाजार समितीचा उपक्रम असुन दिंद्रुड येथे उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीच्या हिंदुस्थान पेट्रोलियम पंपाचे साध्या पद्धतीने उद्घाटन करण्यात आले. हा पंप दिंद्रुडआडस मार्गावर उभारण्यात आलेला असून, परिसरातील नागरिकांसाठी याचा निश्चित फायदा होईल. माजलगाव बाजार समितीचा आणखी विस्तार करण्यासाठी कृषी विभागाकडून जमीन मिळावी, यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा केला जात असुन लवकरच ही जमीन हस्तांतरित होईल. तसेच माजलगाव, वडवणी आणि धारूर या तिन्ही बाजार समिती सुस्थितीत असल्यामुळे, शेतकऱ्यांसाठी अधिक सुविधा निर्माण करण्याचे प्रयत्न सातत्याने सुरू आहेत. दिंद्रुड येथे शेड निर्मित करून आडत दुकाने सुरू करण्याचे नियोजन आहे आणि लवकरच हे कामही मार्गी लागेल अशी अपेक्षा व्यक्त करत पेट्रोल पंप उद्घाटनास शुभेच्छा दिल्या तर अध्यक्षीय समारोपात बाबुराव पोटभरे यांनी सभापती नरवडे व उपसभापती मोरे यांच्या नेतृत्वात बाजार समिती चांगले काम करत असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन कनिष्ठ लिपिक सिद्धेश्वर येवले यांनी केले तर आभार संचालक कॉ.दत्ता डाके यांनी मानले.कार्यक्रमास संचालक आसाराम घायतिडक, आबाजी भोसले,उद्धवराव नाईकनवरे,संजय कचरे,अमोल जाधव, प्रभाकरराव होके, जुगलकिशोर नावंदर सचिव हरिभाऊ सवणे,अधिकारी, कर्मचारी वर्ग तसेच शेतकरी बांधव उपस्थित होते.



### शेतकऱ्याच्या ट्रॅक्टरमध्ये मोफत डिझेल टाकून पंपाचा शुभारंभ

माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने नेहमीच शेतकरी हित जोपासले जाते. बाजार समितीच्या वतीने पेट्रोल पंप उद्घाटनाला देखील संगम येथील शेतकरी पद्माकर मुंडे यांच्या ट्रॅक्टर क्रमांक एम.एच. २३,६८६९ मध्ये एक हजार रुपयांचे मोफत डिझेल टाकून पेट्रोल पंपाचा शुभारंभ करण्यात आला.

## योगेश्वरी पॉलिटेक्निकमध्ये विविध प्रशिक्षण कार्यक्रम




अंबाजोगाई । प्रतिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित, कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निक व भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाच्या (एम एस एम ई) अंतर्गत इंडो जर्मन टूल रूम, संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२९ सप्टेंबर ते दि.०४ ऑक्टोबर दरम्यान विविध प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर यांच्या संकल्पनेतून योगेश्वरी पॉलिटेक्निक मधील विद्यार्थ्यांना उद्योग समूहांच्या आधुनिक तंत्रज्ञान व मशीन याबाबत माहिती मिळाल्यास हे विद्यार्थी अधिक कौशल्यपूर्ण पद्धतीने विविध उद्योग समूहांमध्ये काम करू शकतील या हेतूने योगेश्वरी पॉलिटेक्निक मध्ये सिव्हिल इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांसाठी टोटल स्टेशन, कॉम्प्युटर इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांसाठी कॉम्प्युटर मेंटेनन्स आणि नेटवर्किंग, ऑटोमोबाईल व मेकॅनिकल विभागातील विद्यार्थ्यांसाठी सीएनसी मशिनिंग व प्रोग्रामिंग व सर्व विद्यार्थ्यांसाठी उद्योजकता विकास कार्यक्रम या विविध प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. इंडो जर्मन टूल रूम औरंगाबाद यांच्या वतीने अशा प्रकारचे प्रशिक्षण शिबिर मराठवाडा विभागात पहिल्यांदा योगेश्वरी पॉलिटेक्निक मध्ये घेण्यात येत आहे. या प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन दि २९ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध उद्योजक व योगेश्वरी शिक्षण संस्थेचे संचालक प्रताप पवार यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक राजेश चंचलानी व इंडो जर्मन टूल रूम चे अभियंता अनिकेत देशमुख आदी उपस्थित होते.या शिबिरासाठी विभागप्रमुख प्रा.रोहित कदम, प्रा.नारायण सिरसाट, प्रा.अतुल फड, प्रा.श्याम गडदे समन्वयक म्हणून काम पाहत आहेत.या उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, उपाध्यक्ष गणपत व्यास,कार्यकारी उपाध्यक्ष ऍड.जगदीश चौसाळकर, सचिव कमलाकर चौसाळकर,प्राचार्य रमण देशपांडे यांनी अभिनंदन केले आहे.



आष्टी : शहरातील किनारा चौकात औदुंबर मेडिकल चे उद्घाटन करताना माजी आमदार साहेबराव दरेकर नाना, युवा नेते जयदत्त धस, ज्येष्ठ नेते लालासाहेब कुमकर, माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, विठ्ठलराव नरवडे, माजी सहाय्यक उप पोलीस निरीक्षक बाबासाहेब मुळीक, जयदीप नरवडे, सुशांत नरवडे (छाया : शरद रेडेकर)

## इनरव्हील क्लब ऑफ बीड ३१३ तर्फे पूरग्रस्तांना मदत

**बीड । प्रतिनिधी**



इनरव्हील क्लब ऑफ बीड यांच्या वतीने चौसाळा जवळील हिंगणी खुर्द या गावातील. व कुर्ला येथील लोकांना गृहपयोगी वस्तू व कडधान्ये, ज्वारी ,गहू बाजरी चे पीठ पॅकिंग साखर चहा पॅकिंग व कपड्यांचे किट्स वितरित करण्यात आले. इनरव्हील क्लब च्या प्रेसिडेंट भारती मुंदडा ,सेक्रेटरी वैशाली पाठक ,आय एस ओ मंगला गुडे -विश्वेकर आय पी पी वैशाली नहार व सदस्या निर्मला काळे या पाच इनरव्हील क्लब सदस्यांनी हिंगणीखुर्द गावात नदी जवळील पूरग्रस्त लोकांना साहित्य वितरित करून त्यांच्या कुटुंबीयांना मदतीसाठी हातभार लावला .फ्रेंडशिप अँड सर्विस या उक्तीनुसार मानव सेवा हीच ईश्व र सेवा समजून या महिलांनी सहकार्य केले. ग्रामस्थ जीवन खाडे यांनी विशेष सहकार्य केले.आज खरोखरी नवरात्रोत्सव निमित्त साक्षात्कार देवीची उपासना घडली असे वाटते. दोन्ही गावातील महिला अत्यंत पोट टिळकेने आपल्या व्यथा सांगत होत्या त्यांचे ते हाल पाहून मन हे लावून जात होते खरोखरीच तेथील ग्रामस्थांची हाल अपेष्टा पाहून शक्य तेवढी मदत करण्याचे मनोगत त्यांनी व्यक्त केले.खरोखरीच लहान मुला सम शेती ची मशागत केलेली जमीन पाहून ते घसा तोडून सांगत होतेत्यांचे दु:ख व हाल शब्दातीत आहे यावेळी अर्चना झोडगे व पुष्पा कासट उपस्थित होत्या.

## ७९ वर्षांपासून मेंगडेवाडीतील ग्रामस्थ रस्त्याच्या प्रतिक्षेत!

तलावाच्या पाण्यातून जीवघेणा प्रवास; अनेकवेळा मागणी करूनही लोकप्रतिनिधी व प्रशासनाचे दुर्लक्ष -डॉ.ढवळे

**पाटोदा । प्रतिनिधी**

**देशाला स्वातंत्र्य मिळून नुकतेच ७९ वर्षे पूर्ण झाली. मात्र अजूनही ग्रामीण भागातील अनेक गावे मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. पाटोदा तालुक्यातील वाघिरा ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या मेंगडेवाडी गावाला आजतागायत डांबरी रस्ता मिळालेला नाही. त्यामुळे येथील ग्रामस्थांना दररोज हाल सहन करावे लागत आहेत.**



ग्रामस्थांनी वारंवार लोकप्रतिनिधींपासून मंत्र्यांपर्यंत किमान रस्त्याची तरी सोय करावी अशी मागणी केली. यासाठी त्यांनी जलसमाधी आंदोलन, रास्ता रोको आंदोलन देखील केले. परंतु केवळ आश्वासनांचे गाजर दाखवले गेले. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट असून ते आता मोठ्या आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत, अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी दिली.

तलावाच्या सांडव्यातून जीवघेणा प्रवास

मेंगडेवाडी ते वाघिरा या रस्त्याची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. रस्ता नसल्याने एस.टी. बससेवा येथे पोहोचत नाही. पावसाळ्यात गावकऱ्यांना दूध-दुभते विक्रीसाठी, बाजारहाट, दवाखाना, तसेच विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी तलावाच्या सांडव्यातून जीवघेणा प्रवास करावा लागतो. पालक दररोज आपल्या लेकरांच्या जीवावर उदार होऊन शाळेत पाठवतात.

ग्रामस्थांचा आवाज

रस्त्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी विष्णु बांगर, मल्हारी आरगुडे, रामेश्वर शिंदे, छत्रभुज रांजवण, राजेभाऊ कदम, जगन्नाथ बोबडे, कृष्णा जगदाळे, श्रीहरी आरगुडे, दिलीप जाधव, यश बांगर आदी ग्रामस्थांनी केली आहे.

लवकरच रास्ता रोको आंदोलन

अहमदपूर-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गापासून फक्त ७ किमी अंतरावर असूनही रस्त्याच्या अभावामुळे ९०० लोकसंख्या असलेल्या गावाला दरवर्षी संकटांना सामोरे जावे लागते. १ ते ४ वीपर्यंत शाळा गावात आहे, मात्र पुढील शिक्षणासाठी वाघिरा, लिंबागणेश, भायाळा येथे जाण्यासाठी रस्ताच नाही. त्यामुळे पालक व विद्यार्थी अक्षरशः वेठीस धरले गेले आहेत.

लवकरच राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन उभारले जाईल, असा इशारा डॉ. गणेश ढवळे यांनी दिला.

## त्रिसुला फाऊंडेशनच्या कृतज्ञता गौरव पुरस्काराने शिक्षकांचा सन्मान

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा केंद्रातील जि.प.प्रा. शाळा रामनगर येथील बदली झालेल्या शिक्षकांच्या कार्याचा गौरव म्हणून त्रिसुला फाऊंडेशनच्या वतीने कृतज्ञता गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक आदर्श शिक्षक शामराव मिसाळ तर प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी संजीवनी जोशी, तलवाडा केंद्राचे मुख्याध्यापक तथा केंद्र प्रमुख अर्जुन बारगजे, माजी मुख्याध्यापक गणपत नाटकर, शिक्षक पुरुषोत्तम पराड, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सचिन गर्जे सह इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळेस सत्कारमुर्ती गणेश चव्हाण, नितीन बेद्रे व शितल नाईकवाडे यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कृतज्ञता गौरव पुरस्काराने सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ देऊन गौरविण्यात आले.यावेळेस संजीवनी जोशी, अर्जुन बारगजे, गणपत नाटकर यांनी पुरस्कार प्राप्त शिक्षकांच्या कार्याचे कौतुक करुन शुभेच्छा दिल्या. तसेच शाळेचे व गावकर्यांचे अभिनंदन करुन सदैव शाळेच्या प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या. त्रिसुला फाऊंडेशनचे अध्यक्ष तथा शालेय व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष मिठ्ठू त्रिंबक आंधळे यांनी शिक्षकांचा गौरव करतांना सांगितले की, या




शिक्षकांचे रामनगरच्या यशस्वी जडणघडणीत महत्वाचे योगदान आहे. आणि असे योगदान देणार्या शिक्षकांच्या कार्याचा गौरव करणे हे आपले कर्तव्य आहे. म्हणून हा सन्मान आपण करत आहोत. यावेळेस सत्काराला उत्तर देतांना शिक्षक गणेश चव्हाण यांनी सांगितले की, शाळेच्या विद्यार्थांनी व गावकर्यांनी खुप आदर दिला आहे. शितल नाईकवाडे यांनी सांगितले की, तेरा वर्ष सेवा देत असतांना कधी त्रास झाला नाही. विद्यार्थांना ज्ञान देत असतांना आनंदाचे वातावरण होते कारण सर्वांचे सहकार्य होते. नितीन बेद्रे यांनी मनोगत व्यक्त करतांना सांगितलं की, या गावात काम करतांना सर्वांचे सहकार्य असल्यामुळे उत्साही वातावरण निर्माण होते. विद्यार्थी व सर्वांच्या सहकार्याने आनंदी शिक्षण देता आले.

यावेळेस शाळेत नवीन आलेल्या शिक्षिका मनिषा जाधव, मंगल मोरे यांचे मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. तसेच ट्रेनी शिक्षिका स्वाती अंकुश मिसाळ यांचा निरोप तसेच आशा सेविका म्हणून निवड झाल्याबद्दल सन्मानीत करण्यात आले. यावेळेस आलेल्या सर्व प्रमुख पाहुण्यांचे स्वागत अध्यक्ष सचिन गर्जे, अंगणवाडी सेविका चंद्रकला नागरगोजे, मदतनीस अर्चना आंधळे, आयटी इंजिनियर विठ्ठल सारूक, रेवननाथ सारुक, माऊली गर्जे, निवृत्ती लाड, नाकाडे भाऊ, आजिनाथ त्रिंबक गर्जे, अंकुश मिसाळ, उत्कर्षा विठ्ठल गर्जे, त्रिसुला फाऊंडेशनच्या समन्वयक वैशाली मिठ्ठू आंधळे, नंदा गर्जे यांनी स्वागत केले. सर्व उपस्थितांच्या परिश्रमाने कार्यक्रम यशस्वी झाला. या बहारदार कार्यक्रमाचे तेवढेच बहारदार सुत्रसंचालन मिठ्ठू आंधळे यांनी केले तर आभार शिक्षिका मंगल मोरे यांनी मानले.




# इतिहासात पहिल्यांदाच जायकवाडीतून ३ लाख क्युसेकचा विसर्ग

## १८९ मंडळांतर्गत ३८०० गावांना महापुराचा फटका

संभाजीनगर। प्रतिनिधी

मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यांत पूरपरिस्थीने दाणादाण उडविली. अतिवृष्टी आणि नाशिक जिल्हयांतील धरणांमधून सोडण्यात येणाऱ्या पाण्यामुळे नदी गोदावरीला महारौद्ररुप धारण केले आहे. खबरदारी म्हणून नदीकाठच्या गावांतील नागरिकांचे स्थलांतर सुरु आहे.

गोदावरीच्या महापुरामुळे पैठण शहरात तब्बल १९ वर्षानंतर पाणी घुसले आहे. जायकवाडी धरणांतून रात्री ११ वाजेच्या सुमारास तीन लाख सहा हजार क्युसेक इतका पाण्याचा प्रचंड विसर्ग करण्यात येत आहे. धरण बांधल्यानंतर पहिल्यांदाच इतका विसर्ग झाला असून ही ऐतिहासिक घटना आहे. रविवारी मध्यरात्रीनंतर झालेल्या जोरदार पावसाने मराठवाड्यात विविध नद्यांना आलेल्या पुरामुळे पुन्हा अनेक गावांचा संपर्क तुटला असून वस्त्या शिवारं जलमय झाली आहेत. शिवाय मराठवाड्यातील सर्व मोठ्या धरणांतून विसर्ग सुरु आहे. मराठवाड्यात शनिवारी रात्रीतून विभागात १८९ मंडळांतर्गत येणाऱ्या ३८०० गावांना अतिवृष्टीचा फटका बसला आहे. हिंगोली, परभणी, नांदेड, धाराशिव, लातूर, बीड, जालना व छत्रपती संभाजीनगर मध्ये तूफान पाऊस झाला. सप्टेंबरमधील २८ दिवसांत विभागात ३६० मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. शनिवारी दिवस व रात्रीतून २८ सप्टेंबरच्या सकाळपर्यंत विभागात एकूण ५५ मिलीमीटर पावसाची नोंद आहे. यात सर्वाधिक पाऊस छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ११० मिमी कोसळला. या पाठोपाठ जालना ६२, बीड ६३, लातूर २५, धाराशिव ३९, नांदेड २६, परभणी ४४ तर हिंगोली जिल्ह्यात ५५ मिमी पाऊस रविवारी सकाळपर्यंत झाला. परभणी जिल्हयावर सलग तीन दिवसांपासून आभाळ कोसळत आहे.



# लवकर छाटणी झालेल्या द्राक्ष बागेतील व्यवस्थापन



लवकर छाटणी केलेल्या द्राक्ष बागेतील व्यवस्थापनासाठी वेलीला पाऊस सुरू होण्यापूर्वी काडी पूर्णपणे परिपक्व होणे महत्त्वाचे असते, यासाठी आर्द्रता नियंत्रणात ठेवावी लागते. यासाठी उशिराचा पाऊस आणि वाढत्या आर्द्रतेमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी वेलीची काळजी घ्यावी लागते, जसे की पानांची आणि फळांची व्यवस्थित वाढ व सतेजपणा राखणे, तसेच घड जिरणे रोखण्यासाठी योग्य फवारण्या करणे, आदी कामे करावी लागतात.

लवकर छाटणी झालेली असल्यास : या बागेत सध्या प्री ब्लूम अवस्थेत द्राक्ष घड दिसून येतील. प्री ब्लूम अवस्थेतील पोपटी रंग आलेल्या घडास १० पीपीएम जीए ३ ची फवारणी फायद्याची राहील.द्रावणाचे चांगले परिणाम मिळण्यासाठी वापरात येणाऱ्या पाण्याचा सामू ६.५ ते ७ असावा. तर द्रावणाचा सामू हा ५.५ ते ६ इतका असावा. असे नियोजन केल्यास दोन पाकळ्यांतील अंतर व पाकळीची लांबी वाढण्यास मदत होईल. हा सामू मिळण्यासाठी द्रावणामध्ये युरिया फॉस्फेट किंवा सायट्रिक ॲसिड वापरता येईल. यावेळी जीएचे विशेष कार्य म्हणजे पेशींची संख्या व आकार वाढवणे होय. जीएची दुसरी फवारणी करायची झाल्यास १५ पीपीएम जीए पहिल्या फवारणीच्या पाच दिवसांनंतर करावी. फवारणीचे चांगले परिणाम मिळण्यामध्ये तापमान आणि आर्द्रता यांची भूमिका महत्त्वाची असते.

सायंकाळी चार वाजल्यानंतर फवारणी केल्यास आर्द्रता योग्य असल्यामुळे जीएचे शोषण करण्याची पानांची क्षमता वाढते. जीएची फवारणी करण्याआधी एक दिवस आधी झिंक आणि बोरॉन प्रत्येकी अर्धा ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारणी केल्यास पानांची जीए शोषण्याची क्षमता वाढते. या वेळी वातावरण कोरडे असल्यामुळे रोग व कीड नियंत्रणासाठी उपलब्ध असलेले बुरशीनाशक व कीडनाशक संजीवकासोबत मिसळणे टाळावे.

# शेवग्याच्या योग्य वाणाची लागवड केल्यास वर्षभर मिळेल भरघोस उत्पादन

राज्यात सध्या पारंपारिक पिकांना फाटा देत, फळ पिकांच्या किंवा मग भाजीपाला पिकांच्या लागवडीकडे शेतकऱ्यांचा कल अधिक दिसून येत आहे. विशेष म्हणजे फळे आणि भाजीपाला पिकांना बाजारात वर्षभर मागणी असते. ज्यामुळे त्यातुन शेतकऱ्यांना मोठी आर्थिक कमाई देखील होते. हीच बाब लक्षात घेऊन राज्यातील बरेच शेतकरी सध्या शेवगा लागवड करताना दिसून येत आहेत. शेवगा शेती ही फायद्याची शेती मानली जाते. कारण शेवग्याच्या झाडापासून प्रामुख्याने फळ, पाने, मुळे यांसारख्या सर्वच बाबींना मागणी असते. त्यामुळे नव्याने शेवगा लागवडीबाबत माहिती जाणून घेताना, शेवग्याच्या एका विशेष प्रजातीची माहिती घेण्याची गरज आहे.

पीकेएम-१ : शेवग्याच्या या विशेष प्रजातीचे नाव 'पीकेएम-१' असे आहे. या शेवग्याच्या जातीचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे ती बारा महिन्यातून दोन वेळा फळ देते. विशेष म्हणजे शेवग्याच्या या जातीच्या एका झाडापासून शेतकऱ्यांना वर्षभर ३० किलोपर्यंत अर्थात ६५० ते ८५० शेंगा मिळतात. बाजारात प्रामुख्याने शेवग्याला ८० से १०० रुपये प्रति किलोचा दर हमखास मिळतो. तर घाऊक बाजारात शेवग्याचा दर हा



५० ते ६० रुपये प्रति किलोच्या खाली कधीच नसतो. ज्यामुळे शेतकऱ्यांना या वाणाच्या माध्यमातून मोठी आर्थिक कमाई करता येते.

'पीकेएम-१' वाणाची वैशिष्ट्ये : हे वाण तामिळनाडू कृषी विद्यापीठाच्या पेरियाकुलम्? फळबाग संशोधन केंद्राने विकसित केले आहे. लागवडीनंतर केवळ सहा महिन्यात या वाणाला शेंगा येतात. एका शेंगेची लांबी ही साधारपणे ४० ते ४५ सेंटिमीटर इतकी असते. विशेष म्हणजे हे वाण महाराष्ट्रातील वातावरणात वर्षातून दोन वेळा भरघोस शेंगा देते. या वाणाच्या शेंगा या वजनदार, चविष्ट असतात. मात्र या वाणाचे शेंगेचे 'बी' फारसे मोठे नसते. 'पीकेएम-१' या वाणाची झाडे साडेचार ते पाच मीटर उंच वाढतात. या वाणाच्या मदतीने शेतकऱ्यांना दोन्ही हंगामात मिळून एका झाडापासून ६५० ते ८५० शेंगा मिळतात.

# रब्बीसाठी आधुनिक मका लागवड तंत्र

महाराष्ट्र राज्यात तृणधान्य वर्गातील एक महत्त्वाचे पीक म्हणून मका या पिकाचा उल्लेख केला जातो. खरीप हंगामाच्या तुलनेत रब्बी हंगामात मका लागवड केल्यास शेतकऱ्यांना अधिक शाश्वत आणि हमखास उत्पन्न मिळवता येते. तृणधान्य पिकांच्या जागतिक उत्पादनात गहू आणि भात यांच्यानंतर मक्याचा तिसरा क्रमांक लागतो. अन्नधान्याच्या पलिकडेही मक्याचा उपयोग स्टार्च, अल्कोहोल, गोंद, रंग, कृत्रिम रबर यांसारख्या विविध औद्योगिक उत्पादनांमध्ये मोठ्या प्रमाणावर केला जातो.

हवामान व जमीन : मका हे उष्ण, समशीतोष्ण आणि थंड अशा सर्व हवामानात येणारे पीक आहे. मक्यासाठी मध्यम ते भारी, खोल, उत्तम निचरा असणारी, भरपूर प्रमाणात सेंद्रिय पदार्थ असणारी व जलधारण क्षमता अधिक असलेली जमीन चांगली असते.

पूर्वमशागत : लागवडीसाठी निवडलेली जमीन तण आणि पूर्वी घेतलेल्या पिकांच्या अवशेषांपासून मुक्त असावी. जमिनीची खोल (१५ ते २० सें.मी.) नांगरट करावी. कुळवाच्या २-३ पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी. शेणखत हेक्टरी १० ते १२ टन टाकावे. हिरवळीचे खत जमिनीत गाडले असल्यास शेणखताची आवश्यकता भासत नाही.

पेरणी : रब्बी हंगामात १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबरपर्यंत पेरणी करावी. एखादा-दुसरा आठवडा पेरणीस उशीर झाल्याने उत्पादनात फारसा फरक पडत नाही. रब्बी हंगामात मका पिकाची लागवड सरी वरंबा पद्धती करावी. ३-४ से.मी. खोलीवर बियाणे पेरावे.

पेरणीचे अंतर व बियाणे प्रमाण : सरी वरंबा पद्धतीत मका पिकाची पेरणी टोकण पद्धतीने करावी. पट्टा पद्धतीने पेरणी केल्यास उत्पन्न वाढ आढळून आले आहे. उशिरा येणाऱ्या आणि मध्यम जातींसाठी ७५ सें.मी. २० सें.मी. अंतरावर टोकण करावे.



लवकर पक्व होणाऱ्या जातींसाठी ६० सें.मी. २० सें.मी. अंतरावर टोकण करावे. बियाणे प्रमाण १५ ते २० किलो/हेक्टरी.

मका पिकाचे वाण व वैशिष्ट्ये : १) मांजरी ९०-११० दिवस; संमिश्र वाण; उत्पन्न ४० ते ५० क्विंटल/हे.; नारंगी, पिवळे दाणे. २) राजर्षी १००-११० दिवस; संकरित वाण; उत्पन्न ५५ ते ६० क्विंटल/हे. ३) डेक्कन १०५ १००-११० दिवस; संकरित वाण; उत्पन्न ५५ ते ६० क्विंटल/हे. ४) करवीर १००-११० दिवस; संमिश्र वाण; उत्पन्न ४० ते ५० क्विंटल/हे.; नारंगी, पिवळे दाणे.५) आफ्रिकन टॉल संमिश्र वाण (चाऱ्यासाठी सर्वोत्तम); उत्पन्न ६० ते ७० टन हिरवा चारा/हे. आणि धान्य ५० ते ५५ क्विंटल/हे.

बीजप्रक्रिया : करपा रोगाच्या नियंत्रणासाठी पेरणीपूर्वी २ ते २.५ ग्रॅम थायरम बुरशीनाशक प्रति किलो बियाण्यास लावावे. तसेच अॅझोटोबॅक्टर जीवाणू संवर्धन २५ ग्रॅम किंवा १०० मि.ली. प्रति किलो बियाण्यास लावून नंतर पेरणी करावी.

खत व्यवस्थापन : रब्बी मका पिकाची जोमदार वाढ होण्यासाठी पेरणीच्या वेळी हेक्टरी ४० किलो नत्र, ६० किलो स्फुरद व ४० किलो पालाश द्यावे. पेरणीनंतर ३० दिवसांनी ४० किलो नत्र द्यावे. तसेच पेरणीनंतर ४५ दिवसांनी उर्वरित ४० किलो नत्र द्यावे.

पाणी व्यवस्थापन : मका पिकाच्या महत्त्वाच्या अवस्थांमध्ये पाण्याचा ताण पडल्यास उत्पादनात लक्षणीय घट येऊ शकते, म्हणून महत्त्वाच्या अवस्थांमध्ये पाणी देणे आवश्यक असते. पेरणीनंतर लगेच पाणी द्यावे. पेरणीनंतर २० ते ४० दिवसांनी (पिकाची शाकीय अवस्था) पेरणीनंतर ४० ते ६० दिवसांनी (पिक फुलोऱ्यात असताना) दाणे भरण्याच्या वेळी (७५-८० दिवसांनी).

आंतरमशागत : पेरणी संपताच चांगल्या वाफशावर तण नियंत्रणासाठी अँट्रॉप ५०% प्रवाही २ ते २.५ किलो प्रति हेक्टरी ५०० लिटर पाण्यात मिसळून सम प्रमाणात जमिनीवर फवारावे. तणनाशक फवारणीनंतर १५ ते २० दिवसांपर्यंत आंतरमशागत करू नये.

किड नियंत्रण : १) खोडकिडा नियंत्रण ईमिडाक्लोप्रिड १ मि.ली./लिटर पाण्यातून फवारावे किंवा कार्बारील भुकटी (८५%) १७०० ग्रॅम/हे. ५०० लिटर पाण्यातून फवारावी. २) गुलाबी अळी ट्रायकोडर्मा चीलोनिस या परोपजीवीचे अंडी असलेले ८ कार्ड प्रति हेक्टरी लावावेत. ३) मावा व तुडतुडे डायमिथोएट १ मि.ली./लिटर पाण्यातून फवारावे. ४) हिरवे कणसे पोखणाऱ्या अळ्या मिथिल पॅराथीऑनची भुकटी २० ते ३० किलो/हे. धुरळावी.

रोग नियंत्रण : १) खोड कुजव्या रोग रोगाची लक्षणे दिसताच ७५% कॅप्टन १२ ग्रॅम प्रति १०० लिटर पाणी या प्रमाणात जमिनीतून दिल्यास पीथियम खोड कुजव्या रोगाचे नियंत्रण करणे शक्य होते. २) करपा रोग - रोगाची लक्षणे दिसून येताच आवश्यकतेनुसार डायथेन एम- ४५ किंवा मॅन्कोझेब २.५ ग्रॅम प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारावे.

काढणी, मळणी व साठवणूक : धान्यासाठी मका पिकाची काढणी कणसावरील आवरण पिवळसर पांढरे आणि दाणे टणक झाल्यावर करावी. प्रथम कणसे सोलून खुडून घ्यावीत आणि सोललेली कणसे दोन तीन दिवस उन्हात चांगली वाळवावीत, त्यानंतर मका सोलणी यंत्राने कणसातील दाणे काढावेत. सोलणी यंत्राने दाणे काढल्यानंतर मका दाण्यात ओलाव्याचे प्रमाण १०-१२ टक्के इतके होईपर्यंत उन्हात चांगले वाळवावे म्हणजे साठवणुकीत किडीमुळे नुकसान होत नाही.




## जागतिक दिवस: आंतरराष्ट्रीय भाषांतर दिन

### महत्वाच्या घटना

१३९९ : हेन्री (चौथा) इंग्लंडचा राजा बनला.
१८६० : ब्रिटनची पहिली ट्राम सेवा सुरु झाली.
१८८२ : थॉमस एडिसन यांचे पहिले व्यावसायिक हायड्रोएलेक्ट्रिक पॉवर प्लांट अमेरिकेतील विसकॉन्सिन, ऍप्लेटॉन येथील फॉक्स नदीवर सुरु झाले.
१८९५ : फ्रान्सने मादागास्कर ताब्यात घेतले.
१९३५ : हूव्हर धरणाचे बांधकाम पूर्ण झाले.
१९४७ : पाकिस्तान व येमेन यांचा संयुक्त राष्ट्रात प्रवेश
१९५४ : यू.एस. एस. नॉटिलस या अणुशक्तीवर चालणाऱ्या पहिल्या पाणबुडीचे जलावतरण.
१९६१ : दुलीप करंडकाचा पहिला सामना मद्रास (चेन्नई) येथे खेळला गेला.
१९६६ : बोत्सवानाला युनायटेड किंगडमपासून स्वातंत्र्य.
१९९३ : लातूर येथे झालेल्या भूकंपात सुमारे १०,००० लोक ठार तर हजारो लोक बेघर झाले.
१९९४ : गीतकार मजरुह सुलतानपुरी यांना राष्ट्रपती शंकरदयाळ शर्मा यांच्या हस्ते 'दादासाहेबफाळके पुरस्कार' प्रदान
१९९८ : राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेतील सेंद्रीय रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. के. एन. गणेश यांना 'शांतिस्वरुप भटनागर' पुरस्कार जाहीर
२००० : देशातील रासायनिक उद्योगाची वाढ आणि प्रगतीसाठी उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांना केमटेक फाऊंडेशनतर्फे 'हॉल ऑफ फेम' हा विशेष पुरस्कार जाहीर
२०१९ : साली बिहार राज्यात झालेल्या पावसामुळे पूरजन्य परिस्थिती निर्माण झाली होती.
२०१९ : साली एअर चीफ मार्शल आर. के. एस भदोरिया यांनी वायुसेना दलाचे प्रमुख पद सांभाळले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१२०७ : फारसी मिस्टीक आणि कवी रूमी यांचा जन्म. (मृत्यू: १७ डिसेंबर १२७३)
१८३२ : मातृदिन (मदर्स डे) च्या सहसंस्थापिका ऍन जार्विस यांचा जन्म. (मृत्यू: ९ मे १९०५)
१८३७ : साली भारतीय हिंदी आणि पंजाबी भाषिक साहित्याचे लेखक व समाजसुधारक तसचं, ''आधुनिक पंजाबी गद्याचे जनक'' पंडित श्रद्धाराम शर्मा यांचा जन्मदिन.
१९२२ : हृषिकेश मुकर्जी चित्रपट दिग्दर्शक (मृत्यू: २७ ऑगस्ट २००६)
१९३३ : प्रभाकर पंडित संगीतकार व व्हायोलिनवादक (मृत्यू: २८ डिसेंबर २००६)
१९३४ : भारतीय-अमेरिकन अभिनेत्री ऍन्ना काश्फी जन्म. (मृत्यू: १६ ऑगस्ट २०१५)
१९३९ : नोबेल पारितोषिक विजेते फ्रेंच रसायनशास्त्रज्ञ ज्याँ-मरी लेह्न यांचा जन्म.
१९४१ : वे५ राष्ट्रकुल सचिव सरचिटणीस कमलेश शर्मा यांचा जन्म.
१९४३ : नोबेल पारितोषिक विजेते जर्मन रसायनशास्त्रज्ञ जोहान डायझेनहॉफर यांचा जन्म.
१९४५ : इस्रायलचे वे१२ पंतप्रधान एहूद ओल्मर्ट यांचा जन्म.
१९५५ : सन मायक्रोसिस्टिम्स चे सहसंस्थापक अँनी बेचोलॉल्म्स यांचा जन्म.
१९६१ : चंद्रकांत पंडित क्रिकेटपटू
१९७२ : शंतनु मुकर्जी ऊर्फ 'शान' पार्श्वगायक
१९८० : मार्टिना हिंगीस स्विस लॉनटेनिस खेळाडू
१९०० : एम. सी. छागला न्यायाधीश, मुत्सद्दी आणि केंद्रीय मंत्री (मृत्यू: ९ फेब्रुवारी १९८१)
१९९७ : डच फॉर्मुला १ ड्रायव्हर मॅक्स वर्स्टॅपन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२४६ : रशियाचे झार यारोस्लाव्ह (दुसरा) यांचे निधन.
१६९४ : मार्सेलिओ माल्पिघी इटालियन डॉक्टर (जन्म: १० मार्च १६२८)
१९१४ : साली प्रख्यात भारतीय उर्दू कवी आणि लेखक अल्ताफ हुसैन हाली यांचे निधन.
१९४३ : साली कलकत्ता शहरावर आधारित मासिक मॉडर्न रिव्ह्यूचे संस्थापक, संपादक आणि मालक तसचं, हिंदू महासभेचे नेता आणि भारतीय पत्रकारितेचे जनक रामानंद चटर्जी यांचे निधन.
१९८५ : चार्लस रिच्टर अमेरिकन भूवैज्ञानिक (जन्म: २६ एप्रिल १९००)
१९९२ : गंगाधर देवराव खानोलकर लेखक व चरित्रकार, 'अर्वाचीन मराठी वाङ्मय सेवक' या कोशाचे सात खंड त्यांनी प्रकाशित केले. (जन्म: १९ ऑगस्ट १९०३)
१९९८ : चंद्राताई किर्लोस्कर 'भूदान' चळवळीतील कार्यकर्त्या
२००१ : केन्द्रीय रेल्वे मंत्री, नागरी हवाई वाहतूक मंत्री, काँग्रेसचे नेते व ग्वाल्हेरच्या राजघराण्याचे वंशज माधवराव शिवाजीराव शिंदे यांचे उत्तर प्रदेशातील मैनपुरी जिल्ह्यात विमान अपघातात निधन (जन्म: १० मार्च १९४५ मुंबई)
२०१४ : भारतीय पाद्री आणि राजकारणी मोलिवि इफ्तिकार हुसैन अन्सारी यांचे निधन. (जन्म: २६ एप्रिल १९४३)



राज्य लोकतंत्र
# मराठवाडा वृत्तांत
मंगळवार दि.३० सप्टेंबर २०२५ | ५



## थोडक्यात



### अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांनी स्वत:चे सरण रचत केले आंदोलन

हिंगोली। प्रतिनिधी

काही शेतकऱ्यांची पूर्ण शेतीच पाण्याखाली गेली असल्याने शेतकऱ्यांनी उदरनिर्वाह करायचा कसा? या त्रागापोटी हिंगोली जिल्ह्यातील गोरेगाव परिसरातील शेतकऱ्यांनी गोरेगाव - जिंतूर महामार्ग रोखत स्वत:चे सरण रचून पेटवून देण्याचा प्रयत्न केला.राज्यासह मराठवाड्यात अतिवृष्टीच्या पावसाने हाहाकार माजला असताना इकडे हिंगोली जिल्ह्यामध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणावर नुकसान शेतकऱ्यांचे झाले आहे. अनेक शेतकऱ्यांची जनावरे वाहून गेली आहेत. अनेक शेतकऱ्यांच्या घरांची पडझड झाली आहे. दरम्यान, शेतकऱ्यांना ५० हजार हेक्टरी मदत द्या, पूर्ण पणे पीकविमा द्या, शेतकऱ्यांना कर्जमाफी द्या, या मागणीसाठी जिवंत पणे सरण रचून रस्ता रोको करत हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आंदोलन केले. कनेरगाव नाका ते येलदरी जिंतूर महामार्गांवर हाताळा पाटीजवळ महिला आणि पुरुष यांनी सुद्धा सहभाग नोंदविला होता.

### पावसाने पिकांचे नुकसान मोठे, शेतकरी हवालदिल

धाराशीव। प्रतिनिधी

परिसरासह संपूर्ण भागात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. हंगामी पिके अवकाळी पावसाच्या तडाख्याने पूर्णपणे उद्ध्वस्त झाली असून शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. त्यामुळे संपूर्ण नुकसानीत सापडलेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजारांची मदत तात्काळ देण्याची मागणी जोर धरू लागली आहे.सोयाबीन, उडीद,



तूर, ऊस या खरीप पिकांनी शेतकऱ्यांना यंदा भरघोस उत्पादनाची आशा दाखवली होती. बियाणे, खते, कीटकनाशके व मजुरीसाठी शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात कर्ज काढले होते. मात्र, सततच्या पावसामुळे शेतात पाणी साचले आहे. अनेक ठिकाणी उभी पिके आडवी पडून कुजण्याची प्रक्रिया सुरू झाली असून रो गराई पसरत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मेहनतीचे आणि गुंतवणुकीचे पाणी पाणी झाले आहे. गावागावांत शेतकरी पिकांचे वाळ लेले, कुजलेले व पडलेले दृष्य पाहून व्यथित झाले आहेत. ''संपूर्ण वर्षाची मेहनत वाया गेली, आता कुटुंब चालवायचे कसे?'' असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे. शेतकऱ्यांना बँकेची कर्जे फेडणे अशक्य झाले असून सावकार व व्याजाचा ताण प्रचंड वाढला आहे.

### प्रभारी तहसीलदारांकडून व्यापाऱ्यांना दमदाटी!

मंठा : तालुक्यातील तळणी येथे सौरऊर्जा प्रकल्पातून वीजपुरवठा करणारे लोखंडी पोल बसस्टॅण्ड परिसरात उभारण्याचा मुद्दा चांगलाच चिघळला आहे. या विरोधात व्यापाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर केले होते. त्यानंतर प्रभारी तहसीलदार प्रतिभा गोरे यांनी कंपनीच्या प्रतिनिधींसह तळणी येथे येऊन व्यापाऱ्यांशी चर्चा करण्याऐवजी पोलिसांचा धाक दाखवून दमदाटी केल्याचा आरोप व्यापाऱ्यांनी केला आहे. यामुळे व्यापाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.यावेळी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे गट) तालुका संघटक ज्ञानेश्वर सरकटे यांनी तहसीलदारांच्या भूमिकेवर जोरदार टीका केली. तर व्यापारी हरि देशमुख, शरद खंदारे, सारंगधर वाकुडकर, बाळासाहेब राऊत यांच्यासह शेकडो व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रभारी तहसीलदारांकडून गावकऱ्यांची बाजू समजून घेण्याऐवजी फक्त कंपनीच्या म्हणण्यावर विश्वास ठेवत धमकावणे हा सरळ अन्याय असल्याची प्रतिक्रिया संतप्त व्यापाऱ्यांनी व्यक्त केली. शेतकरी , व्यापारी आधीच हवालदिल अवस्थेत आहे. अशा वेळी प्रशासनाने त्यांच्या बाजूने उभे राहणे अपेक्षित होते, असे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) चे जिल्हा उपाध्यक्ष कैलास सरकटे यांनी सांगितले.


### जाहीर नोटीस

दिनांक: २८-०९-२०२५

तमाम जनतेस, वित्त संस्थांना, पतसंस्थांना, बँकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक खंडु उत्तम मस्के हे आहेत. सदर मिळकतीचे यापुर्वीचे खरेदीखत क्र. ५२६६/२०२१ दि.२४-१२-२०२१, लिहून घेणार सुफियान रसीक बागवान व लिहून देणार रानी सखाराम वाघमारे या खरेदीखताचा मुळ दस्त व त्या सोबतच्या मुळ पावतीसह नाळवंडी नाका ते आंबेडकर पुतळा या दरम्यान हरवलेले आहे. त्या बाबत खंडु उत्तम मस्के यांनी पोलीस स्टेशन, पेठ बीड येथे ऑनलाईन तक्रार दि.२०-०९-२०२५ रोजी दाखल केली आहे.

सदर मिळकती बाबत नोंदविलेले संलग्न खरेदीखत क्र. ५२६६/२०२१ दिनांक २४-१२-२०२१ मुळ पावतीसह ही कागदपत्रे कोणत्याही बँकेत अथवा वित्तीय संस्थेत गहाण ठेवून कर्ज घेतलेले असल्यास अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांच्या नकलासह कार्यालयात येऊन आमची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास, ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत, ते त्यांनी जाणिवपुर्वक सोडून दिले आहेत, असे समजण्यात येईल. मग कोणाच्याही कर्ज बोजाची अथवा इतर कुठल्याही हक्क हितसंबंधाची कसलीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट मिळकतीचे वर्णन

डि ।। बीड सब डि. ।। बीड पैकी बीड जिल्हा परिषद, बीड हद्दीतील मा. दुय्यम निबंधक साहेब, बीड यांचे कार्यक्षेत्रातील नगर परिषद मालमत्ता क्र.३-१८-६७७७, ज्याचा प्लॉट क्र.६४, सि.टी.एस.नं. ७८८८/१ पैकी, लांबी दक्षिणोत्तर ३० फुट, रूंदी पुर्व-पश्चिम २० फुट, क्षेत्र ६०० चौ. फुट म्हणजेच ५५.७६ चौ.मी., असून सदर मिळकत सर्व्हे नं. १५२ तरफ बोबडे, गांधी नगर, बीड, ता. जि. बीड, ज्याची चतुः सिमाः-

पुर्वेस : प्लॉट नं.६७ पश्चिमेस : प्लॉट नं. ५५, दक्षिणेसः ४ मीटर रूंदीचा रस्ता, उत्तरेस : प्लॉट नं.६५

मार्फत :
**ॲड. एस. आर. राजपुत**
बुंदेलपुरा, बीड
मो.नं. ९०७५५४५९३२

जाहीर नोटीस देणार
**खंडु उत्तम मस्के**
रा. नाळवंडी नाका,
बीड मो.नं. ९२२५५१४४४६


# अहिल्यानगरमध्ये राडा ; पोलिसांचा आंदोलकांवर लाठीहल्ला

अहिल्यानगर। प्रतिनिधी

अहिल्यानगरमधी कोटला गावात पोलिसांनी आंदोलकांवर लाठीचार्ज केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेचा व्हिडिओ समोर आल्यानंतर संतप्त प्रतिक्रिया समोर येत आहे. मुस्लिम धार्मियांच्या भावना दुखवल्या प्रकरणी मुस्लीम समाजाकडून कोटला गावात आंदोलन करण्यात आले होते. यावेळी पोलिसांनी आंदोलकांवर लाठीचार्ज केला आहे. पोलिसांनी काही जणांना ताब्यात घेतल्याची माहिती मिळाली आहे.

मुस्लीम धर्मगुरूचे नाव रस्त्यावर लिहिल्यामुळे मुस्लीम समाजाच्या भावना दुखवल्या. अज्ञात व्यक्तीच्या या कृत्यामुळे नगरमधील लोकांच्या भावना दुखावल्या गेल्या. पोलिसांनी गुन्हा दाखल करून एका संशयित आरोपिला ताब्यात घेतले आहे. अहिल्यानगरमध्ये मुस्लिम धार्मियांच्या भावना




दुखवल्या प्रकरणी मुस्लिम समाजाचं रास्ता रोको आंदोलन सुरु होतं. अहिल्यानगर संभाजीनगर महामार्गांवर रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. आंदोलकांनी अहिल्यानगरमध्ये रस्ता रोको केल्यामुळे प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. अहिल्यानगर शहरातील माळीवाडा भागात असणा-या बारा तोटी कारंजासमोर काही समाजकंटकानी मुस्लीम धर्मगुरू यांचे नाव जमिनीवर लिहून विटंबना केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला.

या घटनेनंतर कोटला गावात आणि नगर शहरात तणाव वाढला. नगरच्या कोतवाली पोलीस स्टेशन समोर शेकडो मुस्लिम बांधव जमा झाला. या घटनेनंतर पोलीस प्रशासन अलर्ट मोडवर होतं. कुणीही अफवांवर वर विश्वास ठेवणे पोलिसांनी आवाहन केले. तसेच हे कृत्य करणा-या एका संशयीताला पोलिसांनी ताब्यात घेतलं होतं.आज सकाळी अहिल्यानगरमध्ये संतप्त मुस्लिम समाज आक्रमक झाला अन्? रस्त्यावर उतरला. त्यांनी नगर- छत्रपती संभाजी महामार्गावर रास्ता रोको आंदोलन केले.

## वैजापूरमध्ये पावसाचा कहर...!

### सर्वच १२ मंडळांत अतिवृष्टी, १२ गावे पुराच्या विळख्यात आली

संभाजीनगर। प्रतिनिधी

दोन दिवस लगातार सुरू असलेल्या पावसामुळे वैजापूर तालुक्यात अतिवृष्टी व ढगफुटीसदृश्य पावसाने हाहाकार माजवला. शहरात अनेक परे वाहून गेली आहेत. शेतकऱ्यांचा पाच जनावरेही बाहून गेले आहे. भिवगाव, नारायणगावसह १२ गावे पुराच्या विळख्यात आली असून, त्यामुळे कोट्यवधी रुपयांचे शेतीपिकांसह मालमत्तेचे नुकसान झाले आहे.



नारंगी धरणातून १६०० क्युसेक विसर्ग सुरू असून, आणखी विसर्ग वाढण्याची शक्यता आहे. आतापर्यंत सुमारे शहरासत तालुक्यातील ४०० कुटुंबांना स्थलांतरित करण्यात आले आहे. दरम्यान, पालकमंत्री संजय शिरसाट व आमदार रमेश बोरणारे यांनी थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व नुकसान झालेल्या कुटुंबाशी संवाद साधून बोलणे करून दिले. शिंदे यांनी तिला मदतीची ग्वाही देत घाबरू नका, आम्ही पाठीशी आहोत, असा दिलासा दिला. तर या दोघांनी मुख्यमंत्र्यांशीही संवाद साधला, प्रशासनाकडून बचाव व मदतकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. तर डॉ. दिनेश परदेशी यांनीही गिरीश महाजनांशी संवाद साधून तालुक्यात हेलिकॉप्टरची मदत देण्यावी मागणी केली.

तालुक्यात मागील चोवीस तासांत १२ पैकी १२ मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली असून, सर्वच मंडळांत सरासरी तब्बल १५० मिलीमीटरच्या पुढे पावसाची नोंद झाली आहे. सर्वात जास्त १८९ मिलीमीटर पाऊस बोरसर व शिबूर मंडळात नोंद झाला. शनिवारी सायंकाळी ते रविवारी सकाळपर्यंत तालुक्यात पावसाने हाहाकार माजवला. सर्वच मंडळांत अतिवृष्टी आणि ढगफुटीसदृश्य पावसाने तालुक्यातील नदी-नाले, ओळ्यांना पूर आला. यामुळे रविवारी अनेक गावांचा संपर्क तुटला असून, काही गावांना बेटाचे स्वरूप आले. अनेक रस्ते पाण्याखाली गेले असून, लोणी बुद्रुक, लासूरगाव, बोरसर या गावांना पुराचा वेढा होता. यामुळे सर्वच मंडळांत कोट्यवधी रुपयांचे शेतीपिकांसह नागरिकांच्या मालमत्तेचे नुकसान झाले आहे.

## गोदाकाठच्या पूरग्रस्तांना 'समृद्धी'ने दिला माणुसकीचा हात

अंबड। प्रतिनिधी

गोदावरी नदीला विक्रमी महापूर आला आहे. जायकवाडी धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी विसर्ग करण्यात आल्यामुळे नदी दुथडी भरून वाहत आहे. यामुळे गोदाकाठच्या अनेक गावांमध्ये पुराचे पाणी शिरले. पूरग्रस्त गावकऱ्यांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यासाठी समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी कर्मचारी व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन रात्री उशिरापर्यंत मदतकार्य केले. तसेच पूरग्रस्त कुटुंबांसाठी तातडीने 'अन्नछत्र' सुरू करून जेवणाची व्यवस्था केली आहे.

गोदावरी नदीत सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे गंभीर पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि तातडीच्या मदतीसाठी रविवारी रात्री भाजपा नेते तथा समृद्धी कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी पुढाकार घेतला. कारखान्याचे कर्मचारी व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन त्यांनी गोदाकाठच्या शहागड, वाळकेश्वर,



गंगा चिंचोली, गोंदी, हसनापूर ,कोठाळा, घुंगर्डे हादगाव, साष्ट पिंपळगाव ,गोरी - गंधारी या गावांतील पूरग्रस्त भागांना भेट दिली आणि मदत कार्य केले. नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यासाठी त्यांनी स्थानिक यंत्रणांना सहकार्य केले. तसेच, सोमवारी अन्नछत्र सुरु करून, पूरग्रस्त कुटुंबांच्या निवासाच्या ठिकाणी जाऊन समृद्धी जेवण पुरविण्याचे काम सुरु केले आहे. या माणुसकीच्या मदतीने संकटकाळात लोकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## मांजरा नदी पाणी पातळीत झपाट्याने वाढ

### नदीपात्रापासून ५ किमी अंतरावर पाणीच पाणी

लातूर। प्रतिनिधी

मागील दहा दिवसांपासून नदीपात्रात पुरस्थिती कायम आहे. परंतु मागील दोन दिवसांपासून जोराचा पाऊस सुरू असल्याने मांजरावरील धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला आहे. यामुळे मांजरा नदीला मिळणाऱ्या २ नद्यांच्या पाणी पातळीत झपाट्याने वाढ होतच आहे.

सलग दोन दिवस जोराचा पाऊस व मांजरा धरणांमधून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग होत असल्याने नदी पाणी पातळीत झपाट्याने वाढ होत आहे. शिवारात सर्वत्र पाणी पाणी झाले आहे नदीपात्रातील वाढणाऱ्या पाण्यावर शेतकरी याकडे लक्ष ठेऊन आहेत. पुरात ११ हजार हेक्टरवरील पिके ही पाण्याखाली गेली आहेत. यात सोयाबीन, तूर, ऊस, भाजीपाला पिके आलेल्या पुरात पाण्याखाली गेली आहेत. शेतीचे अवजारे, शेती पंप मोटारी, जणावरांचा चारा, पुरात वाहून गेले आहे. अतिपावसामुळे सोयाबीन नासून गेले आहे. शेतकऱ्यांच्या हाताशी आलेले पिक गेले आहे. लासोना, बटणपूर,



शिधिकामठ, बोरोळ-शिवाजीनगर गावाच देवणी तालुक्याशी संपर्क तुटला आहे, तर वागरी येथील देवनदी दुथडी भरून वाहत आहे. धरणक्षेत्रातून सोडण्यात येणाऱ्या पाण्यामुळे पुन्हा नदीकाठ धास्तावला आहे. झपाट्याने पाण्याच्या पातळीत वाढ होतंच असल्याने नागरिकांमध्ये चिंतेच वातावरण निर्माण झाले आहे. शिधिकामठ मांजरा नदीवरून लखनगाव जाणारा रस्ता येथील बंधारा व सिमा भागातील सोनाळ बंधारा पाण्याखाली गेला. बोरोळ-शिधिकामठ, शिवाजीनगर -बोरोळ जाणाऱ्या रस्त्यावर पंधरा फुट पाणी चढले.

## ओला दुष्काळ जाहीर करा; पूर्णा तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांचा बैलगाडी मोर्चा

परभणी। प्रतिनिधी

पूर्णा तालुक्यातील सहा महसूल मंडळांमध्ये सप्टेंबर महिन्यात वारंवार झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. परंतु, महसूल व कृषी प्रशासन तसेच राज्य सरकारकडून शेतकऱ्यांच्या समस्यांकडे दुर्लक्ष गेल्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी सोमवारी (दि.२९) पूर्णा तहसील कार्यालयावर भव्य बैलगाडी मोर्चा काढला.

हजारो शेतकरी व शेकडो बैलगाड्यांसह निघालेल्या या मोर्चात ओला दुष्काळ जाहीर करा, पिकविमा भरपाई द्या, कर्जमाफी करा अशा मागण्यांची जोरदार घोषवाक्ये देण्यात आली. यावेळी शेतकरी नेते नरेश जोगदंड, माणिकराव सुर्यवंशी, शिवहार सोनटक्के, मुंजाभाऊ जोगदंड, माधुरी क्षिरसागर, नामदेव कदम, भोसले, सैनाजी माठे, किशोर ढगे यांनी प्रशासन आणि सरकारवर तीव्र



शब्दांत हल्ला चढवला. अतिवृष्टीमुळे खरीपातील पिके उद्ध्वस्त झाली, जमिनी वाहून गेल्या, घरे पडली, संसारोपयोगी वस्तू व जनावरे वाहून गेली. या संकटामुळे शेतकरी कर्जबाजारी होऊन आत्महत्येच्या मार्गाकडे वळू लागल्याचे नेत्यांनी सांगितले. शासनाने मदतीसाठी केवळ दोन हेक्टरची मर्यादा ठेवून अनुदानाची रक्कम १३,५०० रुपयांवरून ८,५०० रुपयांवर आणली. तसेच पिकविमा योजनेतील जाचक अटींमुळे शेतकऱ्यांना योग्य भरपाई मिळण्याची शक्यता नाही. महसूल प्रशासन पिकांचे केवळ ६० टक्के नुकसान झाल्याचा अहवाल देत आहे; मात्र खरी परिस्थिती शंभर टक्के बाधित पिकांची आहे, असा दावा करण्यात आला.

तहसील कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर शेतकऱ्यांनी ठिय्या मांडत प्रशासनाविरोधात घोषणाबाजी केली. ''शासनाने तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करून पीकविमा भरपाई, कर्जमाफी व शेतकऱ्यांना भरीव मदत द्यावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल,'' असा इशारा शेतकऱ्यांनी दिला.


जाहिर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.३१६/२०२५**
**संभाजी भागुजी जाधव विरुद्ध**
**ग्रामपंचायत कार्यालय सानपवाडी,जैताळवाडी,सोनपेठवाडी**

पहा

संभाजी भागुजी जाधव रा. सोनपेठवाडी ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत भागुजी सुधाजी जाधव यांचा दिनांक १२/०९/२०१६ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहून येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस सा.जै,सोनपेठवाडी ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे सा.जै, सोनपेठवाडी ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी. आज दिनाक १५/०९/२०२५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १५/१०/२०२५ ही आहे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**



जाहिर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.३१/२०२५**
**मोहन पि.किसनराव डोके विरुद्ध**
**ग्रामपंचायत कार्यालय कदमवाडी**

पहा

माहेन किसनराव डोके रा. डोकेवाडा ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्मधारक सुनिल मोहन डोके यांचा दिनांक २५/०७/२०१० रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहून येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस कदमवाडी ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे कदमवाडी ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक १४/०९/२०२५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १४/१०/२०२५ ही आहे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**


## अंबड पालिकेकडून लोककल्याण मेळाव्याचे आयोजन

अंबड/प्रतिनिधी

अंबड नगरपालिका विभागाच्यावतीने लोककल्याण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी अभियान अंतर्गत शहरातील हातावर पोट असलेल्या पथविक्रेता यांच्यासाठी केंद्र सरकारने कोविड १९ कालावधीत मागील पाच वर्षांपासून पीएम स्वानिधी योजना राबविण्यात आली होती. या योजना अंतर्गत फेरीवाल्या लाभार्थ्यांना प्रथम टप्पा १० हजार, दुसरा टप्पा २० हजार व तिसरा टप्पा ५० हजार या प्रमाणे खेळते भांडवली कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे. या लाभार्थ्यांसाठी नगर परिषद अंबडकडून १ ऑक्टोबर २०२५ रोजी पंडित गोविंदराव जळगावकर नाट्यगृह अंबड येथे लोक कल्याण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात पथविक्रेता लाभार्थ्यांसाठी प्रधानमंत्री जीवन ज्योति बीमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा बीमा योजना, प्रधानमंत्री मातृत्व वंदन योजना, प्रधानमंत्री जननी सुरक्षा योजना अशा विविध योजनां लिंक करण्यात येणार आहे तसेच दिव्यांग लाभार्थी व इतर नवीन लाभार्थ्यांचे अर्ज भरून घेणे बँकेकडे प्रलंबित असणाऱ्या लाभार्थ्यांचे तात्काळ कर्ज मंजूर करून देणे, आरोग्य तपासणी शिबिर असे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. या योजना विषयी अधिक माहितीसाठी सहाय्यक प्रकल्प अधिकारी संजीव मैंद यांचेशी संपर्क साधावा तसेच जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी उपस्थित राहून या लोककल्याण मेळाव्याचा लाभ घ्यावा असे आवाहन मुख्याधिकारी मनोज उकिरडे यांनी केले आहे.

# परळीत घरगुती गॅसचा काळाबाजार – नागरिकांचा संताप

## सणासुदीच्या काळात प्रशासनाचे दुर्लक्ष, हॉटेलधारकांना गॅस पुरवठा; घरगुती ग्राहक वंचित

परळी । प्रकाश वर्मा

**परळी शहरात घरगुती गॅस सिलिंडरचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला असून, गेल्या पाच दिवसांपासून बुकिंग करूनही नागरिकांना सिलिंडर मिळत नाही. मात्र, त्याच काळात अनेक हॉटेल व व्यावसायिक आस्थापनांना गॅसचा पुरवठा सुरळीत सुरू असल्याची माहिती पुढे येत आहे. त्यामुळे घरगुती ग्राहकांत संतापाची लाट उसळली असून, गॅस एजन्सी व स्थानिक पुरवठा विभागाविरोधात रोष व्यक्त केला जात आहे.**

**पाच दिवसांपासून सिलिंडर गायब**

वैद्यनाथ गॅस डिस्ट्रीब्युटरकडून गाडी आली नाही, माल शिल्लक नाही अशी सबब देत ग्राहकांना थेट नकार दिला जात आहे. अनेकांनी वेळेवर बुकिंग करूनही पाच दिवसांपासून सिलिंडर न मिळाल्याने नागरिकांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. इज्जतसी बूथसह विविध ठिकाणी माल शिल्लक नाही असे फलक लावण्यात आले आहेत.

**हॉटेल धारकांना घरगुती गॅसचा पुरवठा..!**

दरम्यान, नागरिकांच्या चर्चेतून धक्कादायक माहिती पुढे येत असून, गॅसच्या गाड्या आल्या तरी त्यातील मोठा हिस्सा हॉटेलधारकांना सर्रास पुरवला जात आहे. त्यामुळे घरगुती ग्राहकांना सिलिंडर मिळत नसून, सणासुदीच्या काळातही नागरिकांना गॅस वंचित ठेवून हॉटेलवाल्यांना पुरवठा केला जातोय अशी चर्चा जोर धरत आहे.



### सरकारच्या नियमांना तिलांजली

सरकारने हॉटेल व्यवसाय व व्यावसायिक आस्थापनांसाठी स्वतंत्र व्यावसायिक सिलिंडरची तरतूद केली असताना, घरगुती सिलिंडर जास्त दराने विक्री करून काळाबाजार सुरू असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. घरगुती ग्राहकांसाठी असलेला गॅस हॉटेलवाल्यांना विकून एजन्सी धारक काळाबाजार करत आहेत. यावर प्रशासनाने अंकुश आणला नाही तर नागरिक रस्त्यावर उतरण्याची वेळ येईल, असा इशारा नागरिकांकडून देण्यात आला आहे.

### प्रशासनाचे मौन आश्चर्यकारक

स्थानिक पुरवठा विभागाकडे वारंवार तक्रारी पोहोचत असतानाही, कोणतीही कारवाई होत नसल्याचे नागरिक सांगतात. गेल्या काही दिवसांत नागरिकांनी नोंदवलेल्या तक्रारी असूनही, पुरवठा विभाग व गॅस एजन्सी यांच्यावर कारवाई होत नाही. प्रशासनाने डोळेझाक केल्यानेच हा काळाबाजार दिवसेंदिवस फोफावत आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

### नागरिकांचा सवाल

गॅस एजन्सी धारकांवर कडक कारवाई होणार का?
हॉटेलधारकांना घरगुती गॅसचा पुरवठा थांबवला जाणार का?
पुरवठा विभाग या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देणार का?
सणासुदीच्या काळातच घरगुती गॅसचा तुटवडा नागरिकांसाठी त्रासदायक ठरत असून, हॉटेलधारकांना पुरवठा सुरू ठेवणे म्हणजे प्रशासनाचे थेट दुर्लक्ष असल्याचे स्पष्ट झाले आहे. नागरिकांच्या उद्रेकाचा विचार करून, स्थानिक पुरवठा विभाग व प्रशासनाने तातडीने कडक कारवाई करावी, अन्यथा संतप्त नागरिकांच्या आंदोलनाची शक्यता नाकारता येणार नाही.

## बीडीओनी स्वत: लक्ष घालून निञुड घरकुल योजनेतील बोगसगिरीचा पर्दाफाश करावा –बडे

बीड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील निञुड ग्रामपंचायत अंतर्गत शासनाने मंजूर केलेल्या घरकुल योजनेमध्ये बोगसगिरी चे प्रमाणात वाढ होवून ग्रामपंचायतच्या संबंधित कर्मचाऱ्यांना हाताशी धरून घरकुल विभागाचे कर्मचारी घरकुल योजने अंतर्गत आलेले घर न बांधकाम करताच मिळत असलेल्या मलिद्याचा वशिल्याने हाप्ते पाडतात खात्यावर आशा कर्मचाऱ्यांना व त्यांना सहकार्य करणाऱ्यावर तात्काळ कारवाई करून घरकुल योजनेत होणारी बोगसगिरी थांबवावी या साठी गट विकास अधिकारी यांना विधानसभा अध्यक्ष युवा सेनेच्या वतीने निवेदन देवून घरकुल बांधकाम न करताच हाप्ते देणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची केली मागणी.

शासनाच्या वतीने पंतप्रधान घरकुल व इतर घरकुल योजने अंतर्गत गोरगरिबांना आपल्या हाक्काचा घर मिळाव यासाठी ग्रामपंचायत अंतर्गत अनेक लाभार्थींना घरकुल मंजूर केले आहेत.त्यानुसार पहिला त्यांच्या खात्यावर हप्ता वर्ग करण्यात आले आहेत व उर्वरित हाप्त्याची रक्कम घर बांधकाम झालेल्या टप्पा नुसार त्यांना हाप्ता दिला जातो पण निञुड ग्रामपंचायत अंतर्गत मंजूर झालेले घरकुल बांधकाम न करताच ग्रामपंचायत चे ग्रामसेवक, कर्मचारी यांना हाताशी धरून घरकुल विभागाचे इंजिनिअर जोगदंड व संबंधित कर्मचारी आपल्याला मलिदा मिळाला की घर बांधकाम झालेले नसतांनाही हाप्ते देण्याची बोगसगिरी चालू आहे.अशा बोगसगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांमुळे शासनाने घरकुल योजने अंतर्गत आपल्या हाक्काचे घर उभारणीसाठी दिलेल्या पैसे वाया जात असुन ग्रामपंचायत कर्मचारी व घरकुल विभागाचे कर्मचारी संगनमत करून मलिदा खाण्याचे काम करत असल्यामुळे गट विकास अधिकारी यांनी निञुड ग्रामपंचायत अंतर्गत संबंधित घरकुल लाभार्थी यांचे घर बांधकाम झाले आहे का बांधकाम न करता हाप्ते कसे टाकले यांची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी माजलगाव विधानसभा मतदारसंघ युवा सेनेचे अध्यक्ष संतोष बडे यांनी केली आहे.

## पुरात वाहून गेलेला तरुण बेपत्ता, मोटारसायकल सापडली

चौसळा । प्रतिनिधी

चौसळा परिसरात दोन दिवसांपूर्वी झालेल्या मुसळधार पावसामुळे आलेल्या पुरात वाहून गेलेल्या तरुणाची मोटारसायकल अखेर सापडली आहे. मात्र, हा तरुण अद्यापही बेपत्ता असल्याची माहिती स्थानिक प्रशासनाने दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चौसळा येथील सोपनील विक्रम शिंदे (वय ३५) हे दोन दिवसांपूर्वी रात्री आपल्या मोटारसायकलवरून शेताकडे जात असताना नदीच्या पुलावर आलेल्या पान २ वर



**गावात हळहळ व्यक्त**

या दुर्दैवी घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त केली जात आहे. सोपनीलच्या सुरक्षिततेसाठी ग्रामस्थ प्रार्थना करत असून प्रशासनाचे शोधकार्य सुरूच आहे.



आष्टी : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी महोत्सव निमित्त संचलनात भाग घेतला प्रसंगी जेष्ठ सदस्य बाल गोपाल सदस्य जेष्ठ सदस्य श्रीधर पंत सहस्त्रबुद्धे, अँड बाबुराव अनारसे आप्पा, अँड वाल्मीक तात्या निकाळजे, प्रफुल्ल भाऊ सहस्त्रबुद्धे,कैलास भाऊ रेडेकर, अनंत देवा जोशी, शरद रेडेकर महेश दादा हंबर्डे,बाबु ढेंगे,सागर मंडले,आदी

## माजी आमदार भीमराव धोंडे यांच्यावतीने निवासी उप-जिल्हाधिकाऱ्यांकडे १ लाख अकरा रुपयाचा धनादेश सुपूर्द!

आष्टी । प्रतिनिधी

गेल्या आठवड्यापासून अचानक उद्भवलेल्या पूर परिस्थितीमुळे ग्रामीण भागातील शेतकरी शेतमजुरांचे जीवन पूर्णतः संपुष्टात आले आहे.अत्यंत भयावह परिस्थितीमध्ये सापडलेल्या बळीराजाला प्रशासन मदन करेलच... तत्पूर्वी माजी आमदार असलेल्या आणि संवेदनशील लोकप्रतिनिधी म्हणून समजल्या जाणाऱ्या आष्टी,पाटोदा,शिरूर का.चे माजी आ.भीमराव धोंडे यांच्यावतीने आज थेट बीड जिल्ह्याच्या निवासी उपजिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन १ लाख ११ हजार १११ रुपयाचा धनादेश सुपूर्त करून



माणुसकीचा एक पैलू यानिमित्ताने कर्तव्य करत निभावला आहे.दरम्यान,ही बाब सर्वसामान्य शेतकरी शेतमजुरांच्या लक्षात येताच लोकप्रतिनिधी असावा तर असा... अशा भावना सर्वसामान्य ग्रामीण भागातील शेतकरी बांधवातून व्यक्त केल्या जात आहेत.बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडे १ लाख ११ हजार १११ रु.चा धनादेश मुख्यमंत्री सहायता निधीसाठी देताना माजी आ. भीमराव धोंडे,पाटोदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे, ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,पाटोदा पंचायत समितीचे माजी सभापती अनिल जायभाये,समता परिषदेचे तालुकाध्यक्ष दिगंबर नाईकनवरे,पत्रकार हमीद पठाण,माजी सरपंच भागवत वारे,माजी सरपंच प्रफुल्ल सानप आदि मान्यवर उपस्थित होते.

**सर्वजण मिळून शेतकऱ्यांना या संकटातून बाहेर काढू**

आपण केलेली ही मदत फार मोठे कार्य नसून माझे ते कर्तव्य आहे असे मी समजतो.शासन, प्रशासन,लोकप्रतिनिधी आजी–माजी आमदार, खासदार यांच्यासह ज्यांच्याकडे उपलब्धता आहे अशा सर्व घटकांनी जमेल तशी आर्थिक मदत करून ग्रामीण भागातील बांधवांना आपण या संकटातून बाहेर काढू,अशा कर्तव्यशील भावना माजी आ.भीमराव धोंडे यांनी या धनादेश सुपूर्द केल्यानंतर माध्यमांशी बोलताना व्यक्त केल्या.

## महिला सशक्तिकरण हीच काळाची गरज –पूजाताई कुलकर्णी



अंबाजोगाई । प्रतिनिधी

वेगाने बदलत जाणाऱ्या आधुनिक युगात महिला अबला नसून सबला झाली पाहिजे त्यासाठी महिला सशक्तिकरण ही काळाची गरज असून प्रत्येक महिला देवीचे रूप असून सशक्तीकरणाचे ऊर्जा स्तोत्र म्हणजे स्त्रीशक्ती आहे खोलेश्वर परिवारामध्ये माझा यथोचित सन्मान केला, माझा सत्कार केला हे मी माझं भाग्य समजते असे उद्गार समाजसेविका तथा कोषाध्यक्ष योगेश्वरी देवल कमिटीच्या सौ.पूजा ताई कुलकर्णी यांनी केले

खोलेश्वर महाविद्यालय अंबाजोगाई अंतर्गत तक्रार समिती आयोजित शतकाचे तेज व अमृताची ऊर्जा रुपी शारदा उत्सव निमित्ताने त्या बोलत होत्या

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ.बिभीषण फड होते तर मंचावर उपप्राचार्य गौतम गायकवाड,उपप्राचार्य डॉ.रवींद्र कुंबेफळकर पान २ वर

## केज शहरात ‘शिक्षक कॉलनी’ भागात एकाच रात्रीत चार घरफोड्या

### पोलिसांनी २४ तासांत चार आरोपींना ठोकल्या बेड्या

केज । प्रतिनिधी

केज येथील शिक्षक कॉलनी परिसरात चोरट्यांनी हैदोस घालत एकाच रात्री चार घरे फोडल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. या घरफोड्यांमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, घटनेची माहिती मिळताच केज पोलिसांनी तात्काळ सूत्रे हलवत अवघ्या २४ तासांच्या आत चार आरोपींना

बेड्या ठोकून चोरीचा पर्दाफाश केला आहे. पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे आणि त्यांच्या पथकाच्या या जलद आणि महत्त्वपूर्ण कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

केज शहरातील प्रतिष्ठित असलेल्या शिक्षक कॉलनी भागात अज्ञात चोरट्यांनी मध्यरात्रीच्या सुमारास बंद असलेल्या चार घरांना लक्ष्य केले. घरांचे कुलूप तोडून चोरट्यांनी आत प्रवेश केला पान २ वर

**पोलीस निरीक्षक उनवणेंचे अभिनंदन**

पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या नेतृत्वाखालील तपास पथकात सहभागी असलेल्या सर्व अंमलदारांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे. शहरातील नागरिकांनी व शिक्षक कॉलनीतील रहिवाशांनी पोलिसांच्या या कामगिरीबद्दल त्यांचे अभिनंदन केले आहे. तसेच शिक्षक कॉलनी भागात सतत होत असलेल्या चोरींच्या घटनांमुळे या भागातील गस्त वाढवण्यात यावी अशी मागणी येथील रहिवाशांनी पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्याकडे केली आहे.

## जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे शैक्षणिक शुल्क माफ करावे –सय्यद सज्ञाद

पाटोदा । प्रतिनिधी

सध्या बीड जिल्ह्यात अतिवृष्टी अति पाऊस ,पूर परिस्थिती मुळे अधिक नुकसान झाले आहे. व शेतकऱ्यांचे कष्टकऱ्यांचे मजुरांचे कामगारांचे पूर परिस्थितीमुळे होणारे हाल आणि वाहून गेलेले घर -संसार, अन्नधान्य व कष्टकरी मजुरांना हाताला काम नसल्याने बीड जिल्हा तसेच जिल्ह्यातील अनेक तालुक्यांना पुराचा आणि अतिवृष्टीचे जास्त प्रमाणात नुकसान झाल्याने हदबल असलेला शेतकरी कष्टकरी व कामगार मजुर अत्यंत बिकट संकटात असून सध्या तरी स्वतःच्या मुला- मुलीचे शिक्षणाचा खर्च चालणार कसा हा प्रश्न सर्वात मोठा निर्माण झाला आहे. आणि अशाच परिस्थितीमध्ये जिल्ह्यामध्ये महाविद्यालय मोठ्या प्रमाणात असून विविध अभ्यासक्रमाचे परीक्षा शुल्क जास्त असल्याने तसेच परीक्षा मंडळ व विद्यापीठाचे शैक्षणिक शुल्क हे अधिकच्या प्रमाणात असल्याने सध्या तरी शासनाने अतिवृष्टी बीड जिल्ह्यामध्ये ज्या तालुक्यांमध्ये जास्तीत -जास्त प्रमाणात अतिवृष्टी झाली आहे .त्या तालुक्यातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करण्यात यावे. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा सेवा सहकारी संस्था संचालक- सय्यद सज्जाद यांनी केली आहे.

## उमरद खालसा ते भाटसांगवी रस्ता तत्काळ दुरुस्त करा –राहुल टेकाळे

### तहसीदार यांच्या मध्यस्थीने आंदोलन तात्पुरते स्थगित



बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील उमरद खालसा ते भाटसांगवी हा डांबरी रस्ता रहदारीचा रस्ता आहे उमरद खालसा, नागपूर बुद्रुक, बऱ्हाणपूर, भाटसांगवी, राक्षसभवन, कुक्कडगाव, चव्हाणवाडी या गावांना जोडणारा मुख्य रस्ता आहे. या रस्त्यावर उमरद खालसा या गावामध्ये रस्त्याला मोठ मोठे खड्डे पडले असून पावसाळयात या खड्यामध्ये पाण्याचे ढव साचत आहेत. या मुळे काँग्रेसचे राहुल टेकाळे यांच्या नेतृत्वाखाली खड्ड्यात पाण्यात बसून घोषणाबाजी करत ठिय्या आंदोलन करण्यात आले. या वेळी आंदोलकांना बीड तहसीदार शेळके साहेब, जिल्हापरिषद अभियंता चोपडे साहेब यांनी एका आठवड्यात तहसील व जिल्हा परिषद यांची संयुक्त बैठक घेऊन प्रश्न पान २ वर

## पूर संकटात शिवसेना जनतेच्या पाठीशी

### उद्धव बापू मडके यांनी मदतीबरोबरच वाचवले नागरिकांचे प्राण

गेवराई । प्रतिनिधी

गोदावरी नदीला आलेल्या पुरामुळे भोंगलगाव गंगावाडी परिसरात निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीत शिवसेना तालुकाप्रमुख उद्धव बापू मडके यांनी वेळेवर पुढाकार घेऊन नागरिकांच्या सुरक्षेसाठी संवेदनशील आणि जबाबदार भूमिका निभावली. पूर पाण्याचा वेग वाढताच त्यांनी तातडीने गावातील नागरिकांना जिल्हा परिषद शाळा तलवाडा येथे सुरक्षित ठिकाणी हलवले व रात्रीच्या मुक्कामाची सुविधा उपलब्ध करून दिली.




या वेळी गेवराईचे तहसीलदार श्री. खोमणे साहेब, मंडळ अधिकारी सोनवणे साहेब, तवले तलाठी पांचाळ तसेच स्थानिक शिवसैनिक वैजनाथ बोराडे, अमोल चिकने, परमेश्वर जाधव, बालाजी जाधव, ईश्वर मडके, विकास मडके, राम मडके यांनी नागरिकांसह पशुधनाचेही सुरक्षित स्थलांतर केले.

श्री. मडके यांनी नागरिकांना या सर्व योजनांची सविस्तर पान २ वर

## दै.राज्य लोकतंत्रच्या वृत्तानंतर कृषी अधीक्षक आले वठणीवर

जालना । प्रतिनिधी

दै.राज्य लोकतंत्र च्या बातमीमुळे कृषी अधीक्षक वाटणीवर आले जिल्हा कृषी अधीक्षक गहीनीनाथ कापसे येणे अतिवृष्ट अनुदान प्रकरणी कृषी विभागाचे कर्मचाऱ्याला वाचवण्यासाठी २५ लाख रुपये खाल्ल्याचा आरोप आमदार आ. लोणीकर यांनी केला आहे. तसेच जिल्ह्यामध्ये ढगफुटी



मुसळधार पावसामुळे नुकसानग्रस्त भागामध्ये पाहणी करीत नसल्यामुळे दै राज्य लोकतंत्र या वार्ता पत्रामध्ये २९ सप्टेंबर रोजी बातमी प्रसिद्ध केली होती या बातमीमुळे आज पूरग्रस्त भागामध्ये मदत करण्यासाठी जिल्हा कृषी अधीक्षक कापसे धावले.जिल्हा कृषी अधीक्षक कापसे हे स्वतःला पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# वैष्णवी हगवणे प्रकरणात सासू, नणंद, निलेश चव्हाणला कोर्टाची चपराक, जामीन अर्ज फेटाळला

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील बहुचर्चित वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणात (तरळीहपर्रीळ क्र्रसर्रींपश)मोठी अपडेट आहे. सासरच्या छळाला कंटाळून आत्महत्या केलेल्या वैष्णवी हगवण्याच्या सासू, नणंद आणि पतीच्या मित्राने दाखल केलेला जामीन अर्ज पुणे न्यायालयाने फेटाळला आहे. नऊ महिन्यांच्या बाळाची आई कोणत्याही दबावाशिवाय असा टोकाचा निर्णय घेऊ शकत नाही असं सांगत न्यायालयाने वैष्णवी हगवणेच्या सासु, नणंद आणि पतीचा मित्र निलेश चव्हाण या तिघांचाही जामीन अर्ज फेटाळला आहे.



सासरच्या छळाला कंटाळून १६ मे रोजी वैष्णवी हगवणे या विवाहित महिलेने आत्महत्या केली. या प्रकरणाने संपूर्ण राज्य हादरलं होतं. यानंतर हगवणे कुटुंबीयांचे राजकीय लागेबांधे, पोलिसांवर असलेला प्रभाव आणि कौटुंबिक हिंसाचाराची पार्श्वभूमीबद्दल माहिती समोर आल्यानंतर पिंपरी चिंचवड पोलिसांनी सासरे राजेंद्र हगवणे यांचा मुलगा सुशील हगवणे तसेच सासू, नणंद व आरोपी निलेश चव्हाणलाही अटक केली होती.

पुण्यातील मुळशी तालुक्यातील हे मृत्यू प्रकरणाने पुन्हा एकदा हुंडाबळी विषयी चर्चेत आला होता. लग्नाच्या वेळी २१ तोळे सोने, फॉर्च्युनर गाडी, चांदीची भांडी आणि सुचविलेल्या कार्यालयात लग्न लावून देण्याचे मान्य करूनही लग्नाच्या दुसऱ्या दिवसापासून सासू-सासरे आणि नवऱ्याने वैष्णवी चा छळ करण्यास सुरुवात केली होती. चार-पाच महिन्यानंतर सासूने चांदीच्या भांड्यांची मागणी केली. गर्भवती वैष्णवीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला मारहाण करण्याचा आरोप ही माहेरच्या लोकांनी केला होता. दरम्यान, वैष्णवी हगवणे प्रकरणातील मोठी अपडेट समोर आली आहे.या प्रकरणातील सासू, नणंद आणि पतीच्या मित्राचा जामीन अर्ज पुणे न्यायालयाने फेटाळला आहे. वैष्णवीची सासू लता राजेंद्र हगवणे, नणंद करिश्मा राजेंद्र हगवणे आणि पतीचा मित्र नीलेश रामचंद्र चव्हाण अशी जामीन फेटाळलेल्या आरोपींची नावं आहेत. आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी जामीन अर्ज पुणे न्यायालयाने फेटाळला. आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याच्या गंभीर आरोपाखाली ही कारवाई करण्यात आली असून आरोपींना तुरुंगातच राहावं लागणार आहे.नऊ महिन्यांच्या बाळाची आई दबावाशिवाय असा टोकाचा निर्णय घेऊ शकत नाही. हुंडाबळी हा समाजाला मोठा कलंक आहे. आरोपींवर आत्महत्येला प्रवृत्त करणे, कट कारस्थान रचणे, पुरावे नष्ट करणे आणि आरोपींना लपवण्याचे गंभीर आरोप आहेत. त्यामुळे आरोपींना जामीनावर सोडल्यास साक्षीदारांवर दबाव येण्याची किंवा पुराव्यात छेडछाड होण्याची शक्यता आहे. पीडितेच्या हक्कासोबत समाजहितही लक्षात घेणे आवश्यक असल्याचं कोर्टानं म्हटलं

## तीन महिन्यांपासून पोलिसांना गुंगारा देणारा गुंड पोलिसांच्या ताब्यात; रिक्षाचालकाला केली होती मारहाण



पुणे । प्रतिनिधी

रिक्षात गाणी ऐकत थांबलेल्या रिक्षाचालकाला बेदम मारहाण करून पसार झालेल्या गुंडाला वानवडी पोलिसांनी छत्रपती संभाजीनगरमधून अटक केली. गेले तीन महिने सराइत पोलिसांना गुंगारा देत होता.

ऋषीकेश सुनील बागुल ( २७, रा. एसआरए वसाहत, शिंदे वस्ती, हडपसर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी एका रिक्षाचालकाने वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.तक्रारदार रिक्षाचालक हा ४ जुलै रोजी एसआरए वसाहतीच्या आवारात रिक्षातील ध्वनीवर्धक यंत्रणेवर गाणी ऐकत थांबला होता. तो नातेवाईकांची वाट पाहत थांबला होता. त्यावेळी आरोपी ऋषीकेश बागुल आणि साथीदार तेथे आले.त्यांनी रिक्षातील ध्वनीवर्धक यंत्रणा बंद करण्यास सांगितले. या कारणावरुन वाद झाला. त्यानंतर बागुल आणि साथीदारांनी रिक्षाचालकाला लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली. त्याच्यावर तीक्ष्ण शस्त्राने वार केले. रिक्षाचालकाच्या खुनाचा प्रयत्न केल्या प्रकरणी बागुलसह साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.या घटनेनंतर बागुलबरोबर असलेल्या साथीदारांना अटक करण्यात आली होती. मुख्य आरोपी बागुल हा पसार झाला होता. पोलिसांनी त्याचा शोध घेतला. मात्र, तो सापडला नाही. पसार झालेला बागुल हा छत्रपती संभाजीनगरमध्ये असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.वैजापूर बसस्थानक परिसरात सापळा लावून त्याला अटक करण्यात आली. बागुल हा सराइत गुन्हेगारी असून, यापूर्वी त्याच्याविरुद्ध हडपसर, शिवाजीनगर, फरासखाना पोलीस ठाण्यात गंभीर स्वरुपाचे सात गुन्हे दाखल झाले आहेत.

## डुडूळगाव येथे देशी वृक्ष लागवड मोहिमेस सुरुवात

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड महापालिका, वन विभाग पुणे व वेदव्यास प्रतिष्ठान पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपरी चिंचवड शहरात एक लाख देशी वृक्षांची लागवड करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात पहिल्या टप्प्यात ५० हजार देशी वृक्ष लागवड करण्यात येणार असून या मोहिमेचा प्रारंभ आज डुडूळगाव येथे महर्षि वेदव्यास प्रतिष्ठानचे अध्यक्ष प.पू. स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज आणि महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या शुभहस्ते झाला.



पिंपरी चिंचवड महापालिका, वन विभाग व वेदव्यास प्रतिष्ठान पुणे संयुक्त उपक्रमातून एक लाख देशी वृक्ष लागवड करण्याचे नियोजन

याप्रसंगी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, वन विभागाचे उपवनसंरक्षक महादेव मोहिते, वनपरिक्षेत्र अधिकारी सुरेश वरक, महापालिकेचे मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, उद्यान अधीक्षक योगेश वाळुंज, उप उद्यान अधीक्षक राजेंद्र वसावे, उद्यान निरीक्षक दादा गोरड, उद्यान सहाय्यक सचिन शिनगारे, शिवाजी बुचडे, प्रथमेश सीनकर, वन विभागाचे वनपाल शीतल खेंडके, प्रमोद रासकर, वनरक्षक अशोक गायकवाड, बाळासाहेब जीवाडे, अंकुश कचरे, कोमल सपकाळ, प्रिया आकेन, प्रीती नागले, ओंकार गुंड, अनिल राठोड, संगीता कल्याणकर, ह.भ.प. प्रभाकर महाराज मोरे, सामाजिक कार्यकर्ते वंदना वहिले, रमेश वहिले, हिरामण आल्हाट, नगाजी वहिले यांच्यासह स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, नागरिक उपस्थित होते.यावेळी स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज म्हणाले, 'वृक्ष म्हणजे मानवाचे खरे सोबती आहेत. देशी वृक्ष लागवड व संवर्धन करून भविष्यातील पिढ्यांना शुद्ध हवा, पाणी व निरोगी वातावरण मिळू शकते. येथील वसुंधरेला वाचविण्यासाठी देशी वृक्षांची लागवड करणे गरजेचे आहे. देशी वृक्ष लागवड मोहिमेत सहभागी होऊन प्रत्येकाने किमान एक झाड लावू

## आरक्षण वादात सौहार्दाची गरज –गोविंद घोळवे

### प्रा. लक्ष्मण हाके यांची पुण्यात सदिच्छा भेट; सामाजिक वीण अबाधित ठेवण्याचे आवाहन

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील ओबीसी आणि मराठा समाजांमध्ये सध्या सुरू असलेल्या आरक्षणाच्या चळवळींना सामाजिक समतेचा आणि सौहार्दाचा आधार आवश्यक आहे, असे मत वरिष्ठ पत्रकार तथा माजी अध्यक्ष, उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे राज्य संघटक गोविंद घोळवे यांनी व्यक्त केले. पुण्यात ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके यांची त्यांनी सदिच्छा भेट घेऊन राज्यातील सामाजिक घडामोडींवर सविस्तर चर्चा केली असून लवकरच मराठा आरक्षण आंदोलन मनोज जरांगे पाटील यांचीही ती भेट घेणार आहेत.



पुणे येथील भेटीत जवळपास एक तास चाललेल्या चर्चेत ओबीसी आरक्षण, मराठा आरक्षण, महाराष्ट्रातील विस्कटलेली सामाजिक वीण आणि आंदोलनाचा सध्याचा प्रवास यावर दोघांमध्ये विचारमंथन झाले. वरिष्ठ पत्रकार आणि शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे राज्य संघटक असलेले

घोळवे म्हणाले,प्रत्येक समाजाला आरक्षण मागण्याचा आणि आपले आरक्षण टिकविण्याचा संविधानिक अधिकार आहे. पण लढाई विचारांची असावी, हत्यारांची नव्हे. छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनीच महाराष्ट्राचा पाया मजबूत आहे. समाजांमध्ये तणाव निर्माण करणे ही महाराष्ट्राच्या संस्कृतीला शोभणारी बाब नाही.

ते पुढे म्हणाले,मनोज जरांगे पाटील आणि प्रा. लक्ष्मण हाके यांनी सामाजिक संतुलन बिघडविणारे कोणतेही कृत्य होऊ नये यासाठी काळजी घ्यावी. भविष्यात मनोज दादांनाही भेटून मी यासंदर्भात चर्चा करणार आहे.घोळवे यांनी हाके यांच्या शांत, विचारशील भूमिकेचे कौतुक करत सांगितले की,हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नेहमी म्हणायचे – जो खरोखर वंचित, पीडित, उपेक्षित आहे त्याला न्याय मिळालाच पाहिजे. हीच माझी भूमिका आहे. मराठा आणि ओबीसी समाजात वैरभाव निर्माण करणे महाराष्ट्रासाठी घातक ठरेल.त्यांनी स्पष्टपणे सांगितले की आपण सर्व एका आईची लेकरं आहोत. व्यक्तिगत टीका, जातीवर, श्रद्धेवर हल्ले करणे चुकीचे आहे. दगडफेक, हाणामारी ही लोकशाहीची हत्यारे नाहीत.प्रा. हाके म्हणाले,माझ्यावर होणारे हल्ले हे महाराष्ट्राच्या परंपरेला शोभणारे नाहीत. सामाजिक संतुलन राखणे ही सर्वांची जबाबदारी आहे.भेटीच्या शेवटी दोघांनीही एकमताने सांगितले की ओबीसी आणि मराठा समाजाने परस्पर आदर राखत, वैचारिक लढाई विचारांच्या माध्यमातूनच लढावी.

## बारामतीत हायवाच्या धडकेत वृध्दाचा मृत्यू

बारामती – शहरातील नीलम पॅलेस चौकामध्ये हायवा ट्रकने धडक दिल्याने एका वृध्दाचा दुर्देवी मृत्यू झाला. सोमवारी (ता. २९) सकाळी साडेअकराच्या सुमारास ही घटना घडली.



या संदर्भात पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फलटण चौकातून पुण्याच्या दिशेने हायवा (क्रमांक एमएच १२- एसएक्स- ४७५०) निघालेला असताना सायकलवरुन निघालेल्या मारुती उमाजी पारसे (वय-७०, रा. गवारे फाटा, बारामती) यांना त्याची जोरदार धडक बसल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी मारुती पारसे यांचा मुलगा सतीश पारसे यांनी शहर पोलिसात फिर्याद दिली आहे.

या फिर्यादीवरुन हायवा चालक राजनारायण बलजीत सिंह (रा. चकदौर, राजस्थान) यास पोलिसांनी अटक केली आहे. या घटनेनंतर हायवा चालकास पकडून पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. संतप्त जमावाने हायवाच्या काचा फोडून निषेध व्यक्त केला.ही घटना घडल्यानंतर स्थानिकांनी काही वेळ वाहतूक रोखून धरली होती. पोलिसांनी हस्तक्षेप करुन नागरिकांची समजूत काढली. संध्याकाळी सात नंतरच हायवा, टीपर, डंपर वाहतूकीस परवानगी दिली जाईल अशी ग्वाही पोलिसांनी दिल्यानंतरच नागरिकांनी वाहतूक सुरळीत करु दिली.दरम्यान या अपघाताविरोधात मंगळवारी (ता. ३०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा स्मारकापासून ते प्रशासकीय भवनापर्यंत सकाळी अकरा वाजता मोर्चा काढण्यात येणार आहे. बारामती शहरातील दिवसा डंपर वाहतूक कायमस्वरूपी बंद करावी, जबाबदार अधिकाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा व अशा अपघातग्रस्त कुटुंबियांना तातडीची मदत जाहीर करावी या मागण्यांसाठी मोर्चा काढला जाणार आहे.

## आंदेकर टोळीची न्यायालयीन कोठडीत रवानगी

पुणे – आयुष कोमकर खूनप्रकरणात अटकेत असलेल्या आंदेकर टोळीतील सदस्यांची सोमवारी (ता. २९) न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी हा आदेश दिला.



आंदेकर टोळीचा प्रमुख सूर्यकांत बंडू अण्णा आंदेकर (वय ७०), तुषार नीलंजय वाडेकर (वय २७), स्वराज नीलंजय वाडेकर (वय २३), अमन युसूफ पठाण (वय २५, सर्व रा. नाना पेठ), सुजल राहुल मेरगु (वय २०), यश सिद्धेश्वर पाटील (वय १९), अमित प्रकाश पाटोळे (वय १९), शिवम ऊर्फ शुभम उदयकांत आंदेकर (वय ३१), अभिषेक उदयकांत आंदेकर (वय २१), शिवराज उदयकांत आंदेकर (वय २९), कृष्णा ऊर्फ कृष्णराज सूर्यकांत आंदेकर(वय ३६), मुनाफ रिजाय पठाण (वय २८, रा. नाना पेठ) यांची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे. तर यापूर्वीच लक्ष्मी उदयकांत आंदेकर (वय ६०, सर्व रा. नानापेठ) आणि वृंदावनी नीलंजय वाडेकर (वय ४०) यांना येरवडा कारागृहात पाठविण्यात आले आहे.

बंडू आंदेकर तसेच सोमनाथ गायकवाड यांच्या टोळी युद्धातून वनराज आंदेकर याचा गेल्या वर्षी गोळ्या झाडून व कोयत्याने वार करून खून झाला होता. या खूनाचा बदला म्हणून गणेश कोमकरचा मुलगा आयुषचा गणेश विसर्जनाच्या पूर्वसंध्येला गोळया झाडून खून करण्यात आला होता, असे पोलिस तपासातून पुढे आले आहे.

गुन्ह्याच्या पुढील तपासासाठी आरोपींच्या पोलिस कोठडीत वाढ करण्यात यावी, अशी मागणी सरकारी वकिल ड. विलास पठारे यांनी केली. तर आरोपी पोलिस कोठडीत असताना झालेल्या तपासाची माहिती तपास अधिकारी असलेले सहायक पोलिस आयुक्त शंकर खटके यांनी दिली.आरोपींच्या वतीने ॲड. मिथुन चव्हाण, ॲड. मनोज माने, ॲड. प्रशांत पवार, ॲड. प्रतीक पवार आणि ड. अमित थोरात यांनी बाजू मांडली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेत न्यायालयाने आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावली.

## गुंड निलेश घायवळ लंडनमध्ये नव्हे स्वित्झर्लंडमध्ये

पुणे: पुण्यात खून, दरोडा, मारामारी, खंडणी सारखे गुन्हे दाखल असलेला कुख्यात गुंड निलेश घायवळ हा सध्या विदेशात असून त्यांचे लोकेशन लंडन आहे असे बोलले जात असताना पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी तो सध्या स्वित्झर्लंड मध्ये असल्याचे स्पष्ठ केले आहे. नुकताच निलेश घायवळसह त्याच्या टोळीवर कोथरूड पोलिसांनी मोक्काची कारवाई केली.



एका तरूणावर गोळीबार करून लगेच दहा मिनिटात दुसर्या तरूणावर धारदार हत्याराने वार करून घायवळच्या टोळीतील सदस्यांनी दोन आठवड्यापूर्वी दोन तरूणांवर वार केले होते. याप्रकरणी त्यातील काही आरोपींना अटक करताना त्यांच्यासह इतरांवर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.दरम्यान गुन्ह्याच्या अनुषंगाने निलेश घायवळची माहिती घेतल्यानंतर तो पुण्यात व अहिल्यानगर परिसरात नसल्याचे निष्पन्न झाले होते. प्रत्यक्षात त्यांची माहिती घेतल्यानंतर त्याचे लोकश सध्या स्वित्झर्लंड येथे असल्याचे निष्पन्न झाले आहे. दरम्यान घायवळला देण्यात आलेलर्ट बद्दलही पुणे पोलिसांकडून चौकशी करण्यात आली आहे.दरम्यान त्याला पासपोर्ट आहिल्यानगर येथील आयुक्तालयातून देण्यात आला आहे. त्याला मिळालेला पासपोर्ट आणि व्हीसा गुन्हेगारी रेकॉर्ड असताना कसा मिळाला असा प्रश्नही या निमित्ताने होत असून पुणे पोलिसांनी याबाबतची चौकशी सुरू केली आहे. त्याने, पासपोर्ट कधी, केव्हा, कसा मिळवला त्या दृष्टीनेही पुणे पोलिस चौकशी करत असल्याचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले.

## देश सक्षम होण्यासाठी प्रत्येक तरुण सक्षम व्हायला हवा

**वडगाव मावळ । प्रतिनिधी**

देश सक्षम होण्यासाठी प्रत्येक तरुण सक्षम व्हायला हवा. आणि त्यासाठी बौद्धिक क्षमतेसोबत शारीरिक क्षमतेचा विकास देखील तितकाच महत्त्वाचा आहे शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक सक्षमता येणे आवश्यक



आहे. तरुण सक्षम झाला तर कुटुंब सक्षम होईल, समाज सक्षम होईल, राज्य सक्षम होईल परिणामी आपला देश सक्षम होईल असे मत पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप गिल यांनी व्यक्त केले.


वडगाव मावळ येथील नवरात्र उत्सवानिमित्त ग्रामदैवत पोटोबा महाराज मंदिर प्रांगणात आयोजित करण्यात आलेल्या सरस्वती व्याख्यानमालेचे कार्यक्रमाचे चौथे पुष्प गुंफताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रांताधिकारी सुरेंद्र नवले तर प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार विक्रम देशमुख, उपविभागीय पोलिस अधिकारी गजानन टोणपे, कायदेतज्ज्ञ ड. केशव मगर, मंचचे संस्थापक अध्यक्ष भास्करराव म्हाळसकर, कार्याध्यक्ष डॉ. रवींद्र आचार्य, व्याख्यानमालेचे अध्यक्ष गुलाबराव म्हाळसकर, अजित देशपांडे, दामोदर भंडारी, धनश्री भोंडवे, आरती राऊत, संतोष भालेराव, अतुल म्हाळसकर आदी उपस्थित होते.कार्यक्रमामध्ये बोलताना पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप गिल यांनी पालकांना आवाहन देखील केले. ते म्हणाले की, सध्याची जीवनशैली पाहता पालकांनी १० ते १८ वयोगटातील शालेय मुलांना सर्वप्रथम समजून घेणे गरजेचे आहे. त्यासाठी मुलांना वेळ द्या. त्यांची मानसिता समजून घ्या. मुलांचे पालक नवे तर मित्र बना, असा सल्ला पोलीस अधीक्षक संदीप गिल यांनी दिला.

## मलनिस्सारण प्रकल्पांमुळे नदी प्रदूषण होणार कमी : केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ

पुणे : पुणे महापालिकेत समाविष्ट करण्यात आलेल्या २३ गावांसाठी केंद्र सरकारने ३३२ कोटी रुपयांच्या मलनिस्सारण आराखड्याला नुकतीच मंजुरी दिली असून त्यामुळे पुणे शहरातील नदी प्रदूषण कमी होण्यास मदत होईल, असा विश्वास केंद्रीय सहकार राज्यमंत्री आणि पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केला.

पर्वती विधानसभा मतदारसंघात सिंहगड रस्ता परिसरातील कल्पना चावला इंग्रजी माध्यम शाळेत आयोजित करण्यात आलेल्या खासदार जनसंपर्क सेवा अभियान अर्थात जनता दरबार कार्यक्रमात मोहोळ बोलत होते. यावेळी नगरविकास राज्यमंत्री आमदार माधुरी मिसाळ, आमदार भीमराव तापकीर यांच्यासह भाजपा पदाधिकारी, माजी नगरसेवक, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

मोहोळ म्हणाले, अटल मिशन फॉर रेज्युव्हनेशन अँड अर्बन ट्रान्सफॉर्मेशन (अमृत) योजनेअंतर्गत या मलनिस्सारण प्रकल्पाची एकूण किंमत १,४३७.९४ कोटी



रुपये असून, त्यापैकी ५३३.८५ कोटी रुपयांचे काम आधीच मंजूर झाले आहे. त्यात नव्याने ३३२.३० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून लवकरच कामाला गती मिळणार आहे. मोहोळ पुढे म्हणाले, या आराखड्यांतर्गत जुन्या ड्रेनेज लाईन्स बदलण्यात येणार असून जवळपास ४७२ किलोमीटर नवीन पाइपलाईन टाकण्यात येणार आहे. यासोबतच ८ नवीन मलशुद्धीकरण केंद्रे (डढझी) उभारली जाणार असून त्यांची एकत्रित क्षमता २०१ एमएलडी (मिलियन लिटर प्रति दिवस) इतकी असेल.खडकवासला, नऱ्हे, जांभुळवाडी, नांदोशी, किरकटवाडी पिसोळी, सणसनगर, कोंढवे धावडे, किर्कटवाडी, भिलारवाडी, सुस, म्हाळुंगे, गुजर निम्बाळकरवाडी, आणि मंगदेवाडी या गावांमध्ये या योजनेअंतर्गत कामांची अंमलबजावणी केली जाणार असल्याची माहिती ही मोहोळ यांनी दिली.पुणेकर नागरिकांच्या मूलभूत सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी पायाभूत सुविधा उभारणीतील हा मोठा टप्पा आहे. समाविष्ट गावांमध्ये स्वच्छ व शास्त्रशुद्ध मलनिस्सारण यंत्रणा उपलब्ध होणार असून, त्यामुळे पुणे शहरातून वाहणाऱ्या मुळा-मुठा नद्यांचे प्रदूषण कमी होण्यास मदत होईल असा विश्वास मोहोळ यांनी व्यक्त केला.

## मसाज पार्लरच्या नावाखाली वेश्या व्यवसाय; महिलेसह चौघांविरुद्ध गुन्हा

पुणे । प्रतिनिधी

खराडी परिसरात एका इमारतीत मसाज पार्लरच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्याव्यवसायावर पोलिसांनी छापा टाकला. याप्रकरणी, चंदनगर पोलिसांनी एका महिलेसह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. त्यामध्ये स्पा मालक, मॅनेजरचा समावेश आहे.

संदीप चव्हाण, रोहित शिंदे, गोपाळ, तसेच स्वाती ऊर्फ श्वेता विजय सूर्यवंशी अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत पोलिस शिपाई वर्षा सावंत यांनी चंदननगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कायद्यानुसार हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चंदननगर-खराडी भागातील एका फिटनेस क्लबजवळ असलेल्या इमारतीत आरोपी मसाज पार्लर चालवित होते. या मसाज पार्लरमध्ये वेश्या व्यवयास सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी बनावट ग्राहकाच्या माध्यमातून खात्री केली. पोलिसांनी मसाज पार्लरवर छापा टाकून कारवाई केली. मसाज पार्लरमधून तीन पीडित तरुणींची सुटका करण्यात आली आहे. चौकशीत मसाज पार्लरमधील तरुणींना आरोपींनी जादा पैशांचे आमिष दाखवून त्यांना वेश्या व्यवसायास प्रवृत्त केल्याची माहिती मिळाली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक सीमा ढाकणे तपास करत आहेत.शहर परिसरात मसाज पार्लरच्या नावाखाली गैरप्रकार सुरू असल्याच्या तक्रारी पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्याकडे करण्यात आल्या होत्या. पोलिस आयुक्तांनी मसाज पार्लरमध्ये सुरू असलेल्या गैरप्रकारांवर कारवाईचे आदेश दिले आहेत. गेल्या चार दिवसांत पोलिसांनी तीन मसाज पार्लरवर छापे टाकून कारवाई केली आहे. मार्केट यार्ड, तसेच पुणे-सातारा रस्त्यावरील धनकवडी भागातील मसाज पार्लरवर कारवाई करून संबंधितांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.